मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ३६ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर १९९८

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

अनुकरणीय

## नागपूरकर मराठ्यांचे (विभागीय) संमेलन

विभागीय संमेलनांची गरज असल्याचे अनेक कुलबांधवांनी पत्राने वा सभासंमेलनात सांगितले आहे.

**नागपूरकर 'वाचि'वीर न होता 'कृति'वीर झाले आहेत.**

प्रतिष्ठानचे नागपूरमधील कुलबांधव प्रभाकर केशव (पृ.३५५) यांनी पुढाकार घेऊन नागपूरकर मराठ्यांची आतापर्यंत तीन संमेलने आयोजित केली. परस्पर परिचय, त्यामधून परस्पर सहकार्य या दृष्टीने ही संमेलने उपयुक्त ठरत असल्याचे कळविण्यात आले आहे.

**नागपूरमधील मराठे कुलबांधवांची सूची तयार करून सर्वांना पाठवण्याचे तसेच यापुढील संमेलन जानेवारी १९९९ मधे मकरसंक्रांतीला घेण्याचे ठरविण्यांत आले आहे.**

या उपक्रमापासून स्फूर्ती मिळून ज्या गावात अगर मुंबई–पुण्यासारख्या महानगराच्या उपनगरात १०–१५ पेक्षा जास्त मराठे कुटुंबे आहेत अशा **आणखी निदान ४-५ ठिकाणी तरी मराठे कुलबांधवांची 'संक्रांत संमेलने' अथवा 'तिळगूळ समारंभ' जानेवारी १९९९ मधे होतील अशी आशा करावी काय? - संपादक.**

*(नागपूरमधील संमेलनाचे निमंत्रण इतरांना मार्गदर्शक ठरेल म्हणून इथे समग्र छापले आहे.)*

सप्रेम वंदे,

नागपूरमधील कुलबांधवांचे तिसरे संमेलन रविवार दि. ४/१०/९८ ला एम्. एल्. ए. होस्टेल अथवा नागभवन येथे दुपारी ४ वाजता सुनिश्चित आहे. कुलबांधवांशी एकोप्याची भावना निर्माण व्हावी व अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी या हेतूने संमेलन उपयुक्त ठरायला हवे. संमेलनास येताना सोबत खालील माहिती आणावी असे नागपुरातील ४६ कुलबांधवांना दि. २२ व २३ रोजी पोष्टकार्डाने कळविले आहे.

१. कुलवृतांतातील तिसऱ्या आवृत्तीसाठी सुधारणा
२. आपला घराणे क्रमांक व वंशावळ पृष्ठ क्रमांक
३. हितगुज तहहयात वर्गणीदार क्रमांक
४. प्रतिष्ठानचा सभासद क्रमांक
५. कुटुंबियांची नावे व जन्मतारखा
६. कुटुंबप्रमुखाचा व्यवसाय/नोकरीचा पत्ता
७. कुटुंबियांपैकी एखाद्याचे विशेष कलागुण
८. संमेलनास किती कुटुंबीय उपस्थित राहतील
९. कुलवृतांताची दुसरी आवृत्ती उपलब्ध आहे काय?
१०. नागपुरातील कुलबांधवांची डिरेक्टरी व्हावी असे आपणास वाटते काय?
११. सर्व कुलबांधवांचे संमेलन नागपुरात व्हावे यासाठी आपण इच्छुक आहात काय?
१२. याव्यतिरिक्त आपण आपले काही विचार सुचविता काय, जसे ११५ घराण्यांची प्रत्येकी वेगळी स्वतंत्र तिसरी आवृत्ती प्रकाशित व्हावी काय?
१३. वरील क्रमांक ८ ची माहिती वेगळ्या पत्राने अथवा टेलिफोनवर त्वरित कळवावी. (टेलिफोन क्रमांक ५४६३१४)

आपला कुलबांधव

**प्रभाकर केशव** (पृ.३५५)

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

### कार्यकारी मंडळ सभा

दर महिन्याच्या दुसऱ्या व गरजेनुसार चौथ्या शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा होते. त्या वेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठानच्या कार्यालयात येऊ शकतो.

मागील तिमाहीत सप्टेंबर १२, ऑक्टोबर १० व २४ आणि १४ नोव्हेंबर रोजी अशा कार्यकारी मंडळाच्या एकूण ४ सभा झाल्या.

### वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची १६वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २० सप्टेंबर १९९८ रोजी प्रतिष्ठानच्या कार्यालयात झाली. (या सभेचा वृतांत स्वतंत्रपणे याच अंकात दिला आहे.)

### नवीन कार्यकारी मंडळ

२० सप्टेंबरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील निवडणुकीनुसार १९९८-२००१ या तीन वर्षांसाठी प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळांतील सभासद :

१) **सुरेश सखाराम** (पृ.३९८), माहीम, मुंबई, - कार्याध्यक्ष
२) **गणेश विनायक** (पृ.११५), नायगाव, मुंबई - कार्योपाध्यक्ष
३) **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई - कार्यवाह
४) **सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ.६७६), अंधेरी, मुंबई - कोषाध्यक्ष
५) **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), मुलुंड, मुंबई, - सभासद, हितगुज संपादक
६) **अरुण दत्तात्रय** (पृ.६१), पुणे, - सभासद
७) **माधव नारायण** (पृ.३२९), डोंबिवली, - सभासद
८) **प्रमोद कृष्ण** (पृ.३२७), ठाणे - सभासद
९) **वामन गणेश** (पृ.५०३), नेरुळ, नवी मुंबई - सभासद
१०) **सदानंद विष्णू** (पृ.४१७), बांद्रा, मुंबई - सभासद
११) **सौ. वृषाली वामन** (पृ.५०३), नेरुळ, नवी मुंबई - सभासद
१२) **डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ.२८४), घाटकोपर, मुंबई - सभासद
१३) **डॉ. शरदचंद्र दत्तात्रय** (पृ.४१७), दादर, मुंबई - सभासद
१४) **पद्माकर जगन्नाथ विद्वांस** (पृ.६२९) विलेपार्ले, मुंबई - सभासद
१५) **रमाकांत माधव विद्वांस** (पृ.६२३) माहीम, मुंबई - सभासद

### शैक्षणिक कर्ज व मदत

इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या पुढील दोन विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षासाठी प्रत्येकी रु. १०,००० शिक्षण निधीतून परतफेडीचे बिनव्याजी कर्ज मंजूर करण्यात आले. (का. मं. सभा १२.९.९८)

१) श्री. किरण विनायक खांबेटे (पृ.६७६), पुणे
२) श्री. सचिन किरण (पृ.२९७), नाशिक

तसेच प्रथम वर्ष वाणिज्य वर्गात शिकणारी सांखळी, गोवा येथील विद्यार्थिनी मीनाक्षी सुरेश (पृ.२१८) हिला शिक्षण निधीतून रु. १,००० विनापरतफेडीची मदत मंजूर करण्यांत आली. (का. मं. सभा १०.१०.९८)

### वैद्यकीय मदत

डोंबिवली येथील कुलबांधव नारायण भिकाजी (पृ.४०१) यांना विशिष्ट हेतु निधीतून किडनी ट्रान्सफर शस्त्रक्रियेसाठी रु. २०,००० मंजूर करण्यात आले.

### देणग्या

या वर्षी १.४.९८ पासून ३०.११.९८ पर्यंत प्रतिष्ठानला निरनिराळ्या कारणांसाठी कुलबांधवाकडून खालीलप्रमाणे देणग्या मिळाल्या.

**शिक्षण निधी**

१) **गोपाळ दामोदर** (पृ.५५३), कऱ्हाड — रु.१,०००
२) **अनंत रामचंद्र** (पृ.३९२), दादर, मुंबई यांचेकडून वडिलांचे स्मरणार्थ श्राद्धदिनी — रु. १०१
३) **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई यांच्या मातोश्री कै. सिंधुबाई यांच्या स्मरणार्थ — रु.१,००१
४) **सौ. सुलभा अनंत** (पृ.३२७), माहीम, मुंबई-१९९७-९८ साली १०वी मध्ये हिंदीसाठी पारितोषिकाची रक्कम — रु. १०१
५) **गजानन चिंतामण** (पृ.१२९), पुणे-वडिलांचे स्मरणार्थ — रु. १०१
६) **उदय दत्तात्रय** (पृ.३२६), मुलुंड, मुंबई-वडिलांच्या अमृत-महोत्सवी वर्षांत प्रवेशाबद्दल — रु. ५०१

**एकूण २,८०५**

**वैद्यकीय मदत निधी**

१) **चिंतामण महादेव** (पृ.२२२), परळ, मुंबई-वडिलांचे स्मृतीसाठी — रु. ५०१
२) **श्रीकांत धुंडिराज** (पृ.४७), रत्नागिरी, मातोश्री कै. सुशीलाबाई यांचे स्मरणार्थ — रु. २५०१

**एकूण ३००२**

**हितगुज निधी**

१) **दत्तात्रेय आत्माराम** (पृ.३२६), मुलुंड, मुंबई, भाऊबीज भेट — रु. ५१
२) **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई — रु. १००

**एकूण १५१**

**बक्षीस निधी**

१) **सौ. सुलभा अनंत** (पृ.३२७), माहीम, मुंबई, १०वीत बोर्डाच्या परीक्षेत हिंदी विषयांत जास्तीत जास्त गुण मिळवणाऱ्या मराठे परिवारीय विद्यार्थ्याला रु. १०१ पारितोषिकासाठी — रु. १०००

---

**वर्धापनदिन समारंभ २६.१.१९९९**

पुणे शाखेतर्फे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन समारंभ २६.१.१९९९ रोजी सायंकाळी ४-८ या वेळात साजरा करण्यात येणार आहे. **सर्व कुलबांधवांनी उपस्थित रहावे असे पुणे शाखेतर्फे आग्रहाचे निमंत्रण.**

**स्थळ :** वेदशास्त्रोत्तेजक सभेचे सभागृह, पेशवे पार्क चौक, हॉटेल विश्व समोर, पुणे ४०० ०३०.

**संपर्क : वा. आ. मराठे**, पुणे (फोन:५४५२५५)
**सौ. नीलांबरी मराठे**, पुणे (फोन : ४५६२७०)

Marathe Pratishthan

२) **प्रभाकर गणेश** (पृ.६१),
दादर, मुंबई, १०वीत बोर्डाच्या
परीक्षेत तांत्रिक विषयांत (व्होकेशनल)
सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास
(रु.५०१) 'गणेश' पारितोषिकासाठी रु. ५०००

**एकूण ६०००**

### हितगुज समिती

मार्च १९९३पासून हितगुज त्रैमासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे. हे काम जवळ-जवळ एक हाती होत आहे असे म्हणणे वावगे होणार नाही. या कामात अधिकाधिक कुलबांधवांचा सहयोग मिळावा म्हणून एक 'हितगुज समिती' स्थापन करण्याचे २०.९.९८च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरविण्यात आले आहे. या समितीचे काम करण्यासाठी **कुलबांधवांनी आपण होऊन पुढे यावे आणि समितीचे निमंत्रक लक्ष्मण शंकर यांचेशी त्वरित संपर्क साधावा** असे आवाहन आहे. (दूरभाष : ५६८०१०४ - मुलुंड अथवा ९११-६९०२६३ - बदलापूर)

### कुलवृतांताचे नूतनीकरण

कुलवृत्तांताचे महत्व विशद करणारा मागील अंकातील मजकूर आपण वाचला असेलच.

आपला कुलवृतांत (२री आवृत्ती) प्रसिद्ध होऊन चार-पाच वर्षे झाली. त्यातली माहिती आता ८-१० वर्षांची जुनी झाली आहे. तसेच अनेक ठिकाणी ती अपूर्ण असल्याचेहि दिसते. त्यामुळे कुलवृत्तांताचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मागील सर्वसाधारण सभेत यासाठी एक समितीहि नियुक्त करण्यात आली आहे.

सर्व घराण्यांचा एकत्रित कुलवृत्तांत एकहाती करणे फार मोठे काम होते. त्याऐवजी एक-एक घराणे अगर घराणे समूह (उदा. गोमंतक घराणी ७० ते ७३) याप्रमाणे विकेंद्रित पद्धतीने हे काम करणे सोपे आणि अधिक उपयुक्त होईल.

**आपापल्या घराण्यापुरती कुलवृतांत नूतनीकरणाची जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या कुलबांधवांनी** कृपया कुलवृतांत समितीचे निमंत्रक **सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ.६७६) **यांचेशी त्वरित संपर्क साधावा**. (दूरभाष : ८२०६९९४).

❖❖❖

# १६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

- **विनायक केशव** (पृ.२०), कार्यवाह-मराठे प्रतिष्ठान

मराठे प्रतिष्ठानची १६वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २० सप्टेंबर १९९८ रोजी झाली. सभेचे वातावरण प्रथमपासूनच उत्साहवर्धक होते. उपस्थिती लक्षणीय होती. विशेष म्हणजे रत्नागिरी संमेलनाचे संयोजक श्री. भास्करराव, गुरुकृपा मंगल कार्यालयाचे श्री. आनंदराव व श्री. अप्पासाहेब मराठे ही रत्नागिरीकर त्रिमूर्ती आवर्जून उपस्थित होती.

या सभेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे आपले एक कर्नाटकनिवासी कुलबंधू श्री. सत्यनारायण रामनाथ (पृ.५७८) हे सुद्धा सभेला उपस्थित होते. त्यांनी आपल्या खणखणीत आवाजात वेदमंत्र म्हटले आणि सभेला एका वेगळ्याच वातावरणात नेऊन सोडले. ते वाशी येथे स्थायिक झाले आहेत.

नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मृत कुलबांधवांना आदरपूर्वक श्रद्धांजली वाहून सभेच्या कामाला सुरवात झाली.

सभेमध्ये नेहमीप्रमाणे वार्षिक ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करण्यात आले. हिशेब तपासनीसांची नेमणूक करण्यात आली. कार्यकारी मंडळाचा वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला. या सभेमध्ये १९९८-२००१ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड करण्यात आली. सर्वश्री अनंत रामचंद्र (पृ.३९२), दादर, विनायक गोपाळ (पृ.६९), माहीम, सदाशिव श्रीधर (पृ.१२१), ठाणे आणि सदाशिव गोपाळ जोशी (पृ.७४१), ठाणे यांनी कार्यकारी मंडळावर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे त्यांचे जागी डॉ. सुरेंद्रनाथ गणेश (पृ.२८४), घाटकोपर, पद्माकर जगन्नाथ विद्वांस (पृ.६२९), विलेपार्ले, रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३), माहीम आणि डॉ. शरद दत्तात्रय (पृ.४१७), दादर यांची कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

अध्यक्ष महाशयांनी मराठे प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेताना एक सूचना केली. प्रतिष्ठानच्या उद्दिष्टपूर्तीची कामे अपेक्षेप्रमाणे होण्याकरता निरनिराळ्या समित्या स्थापन करण्यात याव्या व या समित्यांनी वेळोवेळी कार्यकारी मंडळाबरोबर चर्चा करून कार्य करावे असे त्यांनी सुचविले. अध्यक्षांच्या सूचनेचे स्वागत करण्यात येऊन खालील समित्यांची स्थापना करण्यात आली. समित्यांचे सभासद यथाकाल कार्यकारी मंडळाशी चर्चा करून ठरवावे असे ठरले.

१) **हितगुज समिती** -निमंत्रक लक्ष्मण शंकर (पृ.५२०)
२) **सांस्कृतिक समिती** - निमंत्रक गणेश जाईल (पृ.७५७) व भाऊ मराठे (पृ.५०७-सदानंद विष्णु)
३) **वैद्यकीय समिती** - निमंत्रक डॉ. शरद दत्तात्रय (पृ.४१७), डॉ. कुंदा मराठे
४) **शैक्षणिक समिती** -निमंत्रक प्रमोद कृष्ण (पृ.३७६)
५) **महिला समिती** -निमंत्रक सौ. सुलभा सुरेश (पृ.३९९)
६) **उद्योग प्रेरणा समिती** -निमंत्रक हेमंत महादेव (पृ.३२१) मार्गदर्शक विनायक केशव (पृ.२०)
७) **कुलवृतांत समिती** -निमंत्रक सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६)

दादर येथील कुलबांधव **श्री. काशिनाथ श्रीधर मराठे यांची उद्योग प्रवर्तन निधी स्थापन करण्याविषयीची सूचना** श्री. ल. शं. मराठे यांनी सभेपुढे मांडली. श्री. हेमंत मराठे (उद्योग प्रेरणा समिती) यांनी त्याचे स्वागत केले व स्वतः देणगी देण्याचे आश्वासन दिले. उद्योग प्रेरणा समितीने या सूचनेवर विचार करून कार्यकारी मंडळापुढे योग्य प्रस्ताव ठेवावा असे ठरले.

तसेच या सभेमध्ये कर्नाटकनिवासी कुलभगिनी सौ. सुशिला मराठे यांच्या दोन कानडी कवितांचे मराठी भाषांतर करून कार्यवाह वि. के. मराठे यांनी त्यांचे वाचन केले. सौ. सुशिला मराठे यांनी काव्यरचनेबरोबरच इतर साहित्यिक दालनातहि प्रवेश केल्याचे सांगितले. त्यांना अभिनंदनपर पत्र पाठविण्याचे ठरले.

**सौ. अनुराधा अरविंद** (पृ.२९२), **डोंबिवली** यांनी शिक्षण निधीला नियमित मदत देण्याचे सर्वांना आवाहन केले.

सभेचे काम संपल्यावर त्याच ठिकाणी १९९७-९८ मधील निरनिराळ्या परीक्षांतल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

❖❖❖



Marathe Pratishthan

# १९९७-९८मधील विविध परीक्षांतले बक्षीसपात्र विद्यार्थी

* अशी खूण केलेल्यांचा परिचय मागील सप्टेंबर १९९८ च्या अंकात दिला आहे.

## अ) माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

* १) **रश्मी श्रीकांत काळे** (पृ.३२६-दत्तात्रेय आत्माराम यांची नात), मुलुंड ८९.८७% शाळेत १ला क्रमांक. मराठे परिवारात १०वीत प्रथम

* २) **अजित अशोक** (पृ.८६२), फोंडा, गोवा ८९.४७% गोवा बोर्डात ४३वा १०वीत हिंदीमध्ये मराठे परिवारात सर्वाधिक गुण (८४/१००)



३) **शर्वरी सतीश** (पृ.२३६), नागपूर ८८.५३%

४) **मंदार विनायक** (पृ.३२६), वसई ८७.०६%

५) **श्रुती सुधाकर** (पृ.९०), बोरिवली ८६.१३%

६) **श्वेता धनंजय** (पृ.३१६), पुणे ८४.१३%

७) **रविंद्र रामचंद्र खांबेटे** (पृ.६९८), दादर, मुंबई ८३.६०%

८) **रोहित माधव** (पृ.२३५), दादर, मुंबई ७९.६०%

९) **रामकृष्ण दीपक** (पृ.५३३), शिरोडा, गोवा ७९.२०%

१०) **अनघा रत्नाकर** (पृ.१७०), पाली, जि. रायगड ७८.४०%

११) **भारती दत्तात्रय** (पृ.३३४), नागपूर ७७.०६%

१२) **प्रसाद विश्वनाथ** (पृ.५३८), पाळी, गोवा ७५.२०%

१३) **केतकी अनंत** (पृ.४००), वरळी, मुंबई ७४.९३%

१४) **सानिका जयंत घाटे** (पृ.३२६ -अनंत दामोदर यांची नात), गोरेगाव, मुंबई ७१.६०%

१५) **सिद्धी मनोहर** (पृ.९०), पडेल, जि. सिंधुदुर्ग ७१.२०%

* १६) **स्वाती विष्णु** (पृ.१५९), दादर, मुंबई ७१.०६% कर्णबधिरांत बोर्डात २रा क्रमांक. शाळेत प्रथम क्रमांक

## ब) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)

* १७) **श्रद्धा विजय** (पृ.९६), पिंपरी, पुणे ९६% पुणे विभागांत प्रथम क्रमांक. पी.सी.एम. गटात राज्यात प्रथम. मराठे परिवारांत १२वीत सर्वप्रथम

* १८) **रोहित प्रमोद** (पृ.५१३), पुणे ९२.१७% १०वीतही ८७.६% गुण मिळाले होते. तसेच १९९६ मध्ये राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती.

१९) **कविता नीळकंठ** (पृ.१६०) दादर ७७.१७%

२०) **अल्पना उदय** (पृ.३२६), मुलुंड, मुंबई ८०.१७%



२१) **नचिकेत श्रीकृष्ण** (पृ.३१६), बंगलोर ७६.००%(सेंट्रल बोर्ड)

२२) **राहुल सुरेश** (पृ.२७९), पुणे ७५.५०%

२३) **अजित श्रीनिवास** (पृ.१६३), पनवेल, जि. ठाणे ७२.३३%

२४) **मीनाक्षी सुरेश** (पृ.२१८), साखळी, गोवा ७१.७५% (व्होकेशनल)

२५) **दीप्ती अनंत** (पृ.४००), वरळी, मुंबई ६६.६७%

२६) **मृणाल मुरलीधर** (पृ.२९२), डोंबिवली, जि. ठाणे ६०.८३%

## क) पदविका परीक्षा

२७) **प्रसाद रमेश खांबेटे** (पृ.६७५), पुणे ७७.४४%
वाडिया इन्स्टिट्यूट, पुणे मधून डिप्लोमा मेकॅनिकल इंजिनियरिंग

२८) **निलेश रत्नाकर** (पृ.१७०), पाली, जि.रायगड ६०.००%
बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन, महाराष्ट्र यांचा कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी डिप्लोमा

## ड) पदवी व पदव्युत्तर परीक्षा

* २९) **रविंद्र पद्माकर** (पृ.२५६), नागपूर ८१.८७% बी.टेक (केमिकल टेक्नॉलॉजी-ऑईलपेंट). नागपूर विद्यापीठात ऑइल टेक्नॉलॉजीत प्रथम

३०) **उन्मेष विद्याधर खांबेटे** (पृ.६९८), अंधेरी, मुंबई, ७२.११% बी.टेक. (मेकॅनिकल इंजिनीयरींग)

* ३१) **चेतना श्रीहरि** (पृ.११६), गोवा, ७६.०३% गोवा विद्यापीठात बी. ई. (इले.) मध्ये तृतीय

३२) **पुष्कराज वामन** (पृ.५०३), नेरुळ, नवी मुंबई ६०.८५% मुंबई विद्यापीठ, बी. ई. इलेक्ट्रॉनिक्स

३३) **अमोल अरविंद परांजपे** (पृ.५६३ - व्यंकटेश एन्. मराठे, कारकल यांची नात), दादर, मुंबई ७२.१५% पुणे विद्यापीठ - एम्. बी. ए.

३४) **आरती विद्याधर** (पृ.१५३), नंदुरबार ७८.९२% उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - बी. एस्. सी.

३५) **अनंत गोपाळ** (पृ.५५३), कराड ७८.८३% बी.कॉम. - पुणे विद्यापीठ

३६) **चित्रा विष्णु** (पृ.१५९), दादर, मुंबई ६५.८६% बी.कॉम. - मुंबई विद्यापीठ

३७) **मिनल श्रीराम** (पृ.४२८), अंधेरी मुंबई ६७.००% बी. ए. - मुंबई विद्यापीठ, कॉलेजात १ली पोलिटिकल सायन्समध्ये विद्यापीठात दुसरी

* ३८) **अभिजित अरविंद** (पृ.२९२), डोंबिवली, जि. ठाणे, चार्टर्ड अकौंटंट परीक्षा

## इ) माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

३९) **सुशांत हेमंत** (पृ.४७१), विलेपार्ले, मुंबई, माध्यमिक शिष्यवृत्तीधारक, मराठे परिवारात माध्यमिक शिष्यवृत्तीधारकांत प्रथम

## फ) क्रीडा नैपुण्य

४०) **ऋचा मिलिंद** (पृ.३३१), डोंबिवली, जि. ठाणे. पाँडेचरी येथील बास्केटबॉल राष्ट्रीय स्पर्धेत (मे ९८) महाराष्ट्र संघात (सब ज्युनियर गट) समावेश. आंतरजिल्हा बास्केटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धेत विजयी ठाणे जिल्ह्याची संघनायक (मे ९८)

**(सुशांत व ऋचा या दोघांची अधिक माहिती याच अंकात सभासद वृत्त मध्ये)**



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**अमृतमहोत्सवी दत्तात्रेय आत्माराम**



**मुलुंड, मुंबई येथील मराठे प्रतिष्ठानचे सदस्य दत्तात्रेय आत्माराम** (पृ.३२६) यांनी ११.४.१९९८ रोजी ७५व्या वर्षात पदार्पण केले. **सर्व कुलबांधवांतर्फे त्यांना शुभेच्छा - जीवेत शरदः शतम्।**

त्यांचा जन्म ११.४.१९२४ रोजी आजोळी डहाणू (जि. ठाणे) येथे झाला. पित्याचे छत्र लहानपणीच हरपले. शालेय शिक्षण आगाशीचे आजोबा व मामा डॉ. फाटक यांच्या छत्राखाली झाले. नंतर तांत्रिक विद्यालयांत चार वर्षाचे शिक्षण पूर्ण केले.

इ.स.१९४८ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे ४ महिने कारावास भोगला. १९४९ अखेरीस एका प्रसिद्ध कंपनीत विक्रेत्याची नोकरी मिळाली. ती निवृत्तीपर्यंत इमानेइतबारे केली. १९५० मध्ये विवाहबद्ध झाले. पत्नी नीलाताईंच्या समर्थ साथीने त्यांचा संसार सुखी व समाधानी झाला.

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे स्वतःला जास्त शिक्षण घेता आले नाही त्याची जणू भरपाई करण्याच्या हेतूने त्यांनी आपल्या चारही अपत्यांना उत्तम शिक्षण दिले. दोन मुलगे उदय-बी. एस्.सी. (ऑनर्स), व चंद्रशेखर-बी.कॉम., दोन मुली प्रतिमा-एस्.एस्.सी. आणि माधुरी-बी.कॉम. व्यवहारज्ञानाबरोबरच मुलांना सुसंस्कारी घडविले. समाजबंधन व सामाजिक कर्तव्याची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण केली.

पोहणे आणि ब्रिज हे छंद आजही ते नित्यनेमाने आचरतात. ११.४.९८ रोजी डोंबिवलीतल्या सन्मित्र ब्रिज मंडळाने त्यांच्या या 'तात्यां'चा अमृतमहोत्सवानिमित्त शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. अजूनहि ते नियमितपणे मुलुंडहून डोंबिवलीला ब्रिज खेळण्यासाठी जातात. तसेच नित्यनेमाने मुलुंडमधील टँकवर पोहायलाहि या वयात दुचाकी हाकत जातात. ऑक्टोबर १९९७ मध्ये नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय प्रौढांच्या जलतरण स्पर्धेत ५० मीटर फ्री स्टाईल पोहण्यात त्यांनी रौप्यपदक पटकावले. मुख्य म्हणजे आयुष्यात प्रथमच त्यांनी जलतरण स्पर्धेत भाग घेतला. **प्रथम पदार्पणातच राज्य स्तरीय स्पर्धेत रौप्य पदक प्राप्ती हा केवढा मोठा आनंदाचा क्षण!**

२७.९.९८ रोजी सुना, मुले, नातवंडे यांनी त्यांच्या अमृतमहोत्सवाचा घरगुती समारंभ केला. वडिलांची शिक्षणाविषयीची आस्था ध्यानी घेऊन त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त मराठे प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला रु. ५०० देणगी दिली ही गोष्ट किती औचित्यपूर्ण! मुलांनी दाखवलेली ही सामाजिक जाणीव पाहून वडिलांना किती कृतार्थ वाटत असेल!

सर्व मराठे कुलबांधवांतर्फे दत्तात्रेय आत्माराम यांना पुनःश्च शुभेच्छा-जीवेत शरदः शतम्।

**बास्केटबॉलपटु ऋचा**



**डोंबिवली येथील कुलबांधव मिलिंद माधव यांची कन्या**, मराठे कुलवृत्तांताचे एक शिल्पकार माधव नारायण (पृ.३२९) यांची नात **कु. ऋचा मिलिंद** हिने गेल्या दोन-तीन वर्षात बास्केटबॉलच्या खेळात चांगलेच नाव कमावले आहे.


ती डोंबिवली येथील चंद्रकांत पाटकर विद्यालयात इयत्ता आठवीत शिकत आहे. इयत्ता सहावीपासून तिची या क्षेत्रात घोडदौड चालू आहे. गेल्या वर्षी मुंबई येथील डी.बी. प्रभू आंतर क्लब स्पर्धेत सब ज्युनियर गटात या क्रीडा मालिकेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून तिला 'कोलगेट पामोलिव्ह' पुरस्कार मिळाला होता. तिच्या क्लबची - अग्रज्ञेय व्यायामशाळेची ती कप्तान होती. त्याचवेळी ती आंतरजिल्हा स्पर्धेतही ठाणे जिल्हाची कप्तान झाली व याही स्पर्धेत तिच्या कौशल्यपूर्ण खेळामुळे ठाणे जिल्ह्याला अंतिम सामनाही जिंकता आला व याही स्पर्धेत तिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवडण्यात आले. त्यामुळे लगोलग तिची **राष्ट्रीय पातळीवर खेळण्याकरता महाराष्ट्राच्या टीममध्ये निवड झाली. पाँडेचरी येथे आंतर राज्य स्पर्धेत** महाराष्ट्रातर्फे खेळताना उप-उपान्त्य सामन्यापर्यंत मजल गाठता आली. पण पुढील यश मात्र मिळू शकले नाही.

या वर्षी ज्युनियर गटात तिची निवड झाली व गेल्या महिन्यात सोलापूर व औरंगाबाद येथेही तिने आपल्या क्रीडाचातुर्याची चमक दाखवली. औरंगाबाद येथील आंतर जिल्हा स्पर्धेत अंतिम सामन्यापर्यंत मजल मारता आली.

नुकत्याच झालेल्या **घाटकोपर Y.M.C.A. च्या आंतर क्लब स्पर्धेत १४ वर्षापर्यंतच्या मुलींच्या गटात** तिच्या अग्रज्ञेय व्यायामशाळेने अंतिम स्पर्धा जिंकली आहे व याही वर्षी **कु. ऋचाची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली आहे** आणि लगेचच चालू झालेल्या घाटकोपर Y.M.C.A. च्या १६ वर्षाखालील मुलींच्या गटात ती खेळत आहे. उपउपान्त्य स्पर्धा जिंकली आहे व येत्या २ व ४ डिसेंबरला होणाऱ्या उपान्त्य व अंत्य स्पर्धाही जिंकण्याची ती उमेद बाळगून आहे. **आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याची ऋचाची महत्वाकांक्षा आहे.**

सतत परिश्रम व एकाग्रतेने ती सराव करीत असते. त्यामुळे तिची महत्वाकांक्षा फलद्रूप होईल अशी खात्री वाटते. **सर्व मराठे परिवारीयांतर्फे चि. ऋचाला भावी यशाबद्दल शुभेच्छा!**

## सव्यसाची सुशांत



वयाच्या केवळ १३व्या वर्षीच 'षटकार करंडक' या १६ वर्षांखालील खेळाडूंसाठीच्या क्रिकेट स्पर्धेत निवड झालेला **चि. सुशांत हेमंत** (पृ.३२१) हा या स्पर्धेतील सर्वात लहान खेळाडूंपैकी एक. डावखुरी शैलीदार फलंदाजी आणि उत्कृष्ट यष्टीरक्षण असे दुहेरी पैलू असणारा सुशांत यंदा दैनिक 'सामना' ने आयोजित केलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत



Marathe Pratishthan

मुंबईच्या संघाकडून खेळला. Elf-Vengsarkar Cricket Academy तर्फे आयोजित १४ वर्षांखालील मुलांच्या Elf-cup'98 स्पर्धेत यंदा त्याने Padmakar Shivalkar-XI संघाचे नेतृत्व केले. याच स्पर्धेत त्याला **उत्कृष्ट यष्टीरक्षणासाठी सर्वोत्तम क्षेत्ररक्षकाचे बक्षीस** श्री. सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते मिळाले. या वर्षीचा संतोषकुमार घोष करंडक जिंकणाऱ्या Aarey C. C. या संघाचादेखील यष्टीरक्षक सुशांतच होता. याच संघातर्फे तो Worli Sports Clubची स्पर्धाही खेळला. १९९७ पासून त्याने प्रभू जॉली या संघातर्फे कांगा लीग ही स्पर्धादेखील खेळण्यास सुरवात केली आहे.

पार्ले टिळक विद्यालय (English Medium) या शाळेचा विद्यार्थी असलेल्या सुशांतची या वर्षी Giles आणि Harris या आंतरशालेय क्रिकेट स्पर्धांसाठी तसेच Kichadia Cup आणि Vinoo Mankad Trophy या स्पर्धांसाठी शाळेच्या teamचा कर्णधार म्हणून निवड झाली आहे.

शैलीदार खेळ खेळणाऱ्या सुशांतने क्रिकेट प्रशिक्षणाची सुरवात विलेपार्ले येथील Parleyites Cricket Club मधून केली. सध्या तो Elf-Vengsarkar Cricket Academy येथे क्रिकेट प्रशिक्षण घेत आहे.

क्रिकेटमध्ये प्रगती करतानाच त्याने अभ्यासातही चांगली गती राखली आहे. Middle School (४ थी) आणि High School (७ वी) या दोन्ही Scholarships त्याला मिळाल्या आहेत. १९९६-९७ सालच्या Dr. Homi Bhabha बाल वैज्ञानिक स्पर्धेत त्याला Certificate of Merit मिळाले आहे. चि. सुशांत सध्या ८वी मध्ये आहे.

**खेळ आणि अभ्यास या दोन्ही आघाड्यांवर बाजी मारणाऱ्या सव्यसाची सुशांतचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन आणि भावी यशाबद्दल शुभेच्छा!**

**नांदा सौख्यभरे**

१. **भोंबेडे, गोवा येथील प्रतिष्ठानचे सभासद मधुकर नारायण (पृ.५२१) यांची मुलगी मंजिरी** हिचा विवाह चि. प्रसाद ग. केळकर, सुर्ल, गोवा यांचेशी ३.१२.१९९८ रोजी मुळगाव, गोवा येथे संपन्न झाला.

२. **पुण्यांतील प्रतिष्ठानचे सदस्य अरविंद महादेव चक्रदेव (पृ.७३२) यांचा मुलगा राजेंद्र** याचा विवाह अंजली मधुसूदन जोशी हिच्याशी पुण्यात ४.१२.१९९८ रोजी झाला.

**नवविवाहित वधू-वरांस मराठे प्रतिष्ठानातर्फे हार्दिक शुभेच्छा!**

**सहवेदना**

मराठे प्रतिष्ठानचे **डोंबिवली येथील सदस्य सुरेश गोविंद (पृ.८७) यांची मुलगी श्वेता** (वय १२) अमरनाथ यात्रेची सांगता करण्यासाठी तिच्या शिक्षिका व अन्य १५ मैत्रिणींसह ठाणे जिल्ह्यांतील वज्रेश्वरी जवळील शिवपुरी येथे गेली असता दर्शन घेऊन परतताना दुथडी भरून वाहणारा नाला ओलांडताना तिच्या शिक्षिकेसह ८.९.१९९८ रोजी वाहून गेली. काय हे दुर्दैव!

सुरेश मराठे यांच्या दुःखांत मराठे कुलबांधव सहभागी आहेत.

## न्या. राम केशव रानडे यांच्या 'गीतेच्या गाभाऱ्यात' ह्या पुस्तकातील काही निवडक सुविचार

१) न्याय मिळवण्याकरता दुसरा मार्ग नसेल तर युद्ध करावे.

२) अहंकाराचा नाश करण्याकरता नाम हा रामबाण उपाय आहे. एक म्हणजे अहंकार व त्याचा अंत म्हणजे एकांत.

३) कोणत्याही दुःखावर काळ हे फार मोठे औषध आहे.

४) प्रयोग फसले तरी चालतील पण प्रयोग करणाऱ्याने प्रामाणिकपणा सोडता कामा नये.

५) सुखांत ज्याप्रमाणे आनंद आहे त्याप्रमाणे दुःखांत देखील आनंद आहे. हे ज्याला कळले व वळले तो खरा तत्वज्ञानी.

६) पुस्तकांमुळे माहिती मिळते आणि विचारांमुळे ज्ञान प्राप्त होते.

७) न मिळालेली वस्तु मिळणे याचे नाव योग व मिळालेल्या वस्तूंचे संरक्षण करणे म्हणजे क्षेम.

८) दैव आपल्या हातात नाही, प्रयत्न आपल्या हातात आहे. प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. पाऊस वेळेवर पडेल का हे आपल्या हातात नाही पण जमिनीची मशागत करुन बी पेरणे आपल्या हातात आहे. आपण मशागत केली नाही व बी पेरले नाही तर पाऊस वेळेवर पडूनही पीक येणार नाही. अशा परिस्थितीत अंतःकरणातील ईश्वराला स्मरून आपण योग्य दिशेने जास्तीत जास्त प्रयत्न करावा. यश आले तर नाचू नये व अपयश आले तर खचू नये.

९) सौंदर्य हे स्त्रीचे सामर्थ्य असते तर सामर्थ्य हे पुरुषाचे सौंदर्य असते.

**प्रेषक : सुरेश सखाराम** (पृ.३९९), माहीम.

**खुषीपत्रे**

**१) सव्यसाची संपादक**

आपण एक सव्यसाची संपादक आहात याचा पुनः प्रत्यय सप्टेंबर १९९८ चे हितगुजमध्ये माननीय श्री. सुरेशभाऊंचे वाढदिवसाचे वृत्त देऊन जी औचित्यपूर्ण तत्परता दाखवलीत त्यावरून आला. त्यासाठी खास अभिनंदन आणि धन्यवाद!

- **भास्कर नरहरी** (पृ.४६), रत्नागिरी

**२) प्रतिष्ठानने मला उजेडात आणले**

मी मध्य रेल्वेच्या कॅश ऑफीसमध्ये ३६ वर्षे नोकरी केली. मला मूलतः लिखाणाची भारी हौस. पण नोकरीत लिखाणाशी फारकत. सदोदित आकडेमोड. ह्या संदर्भी एका इंग्रजी म्हणीची सत्यता पटते. ती अशी, 'देअर आर मेनी स्वेयर पेग्ज इन राऊंड होल्स' मला वाटतं फारच थोड्यांना आवडीप्रमाणे पोटापाण्याचा व्यवसाय मिळतो. असो.

**वयाच्या ७५ नंतर का होईना पण मराठे प्रतिष्ठानने मला उजेडात आणले.** आज वय ८१ चालू. मराठे प्रतिष्ठानबद्दल मला फार आदर आहे.

- **अनंत धोंडो खांबेटे** (पृ.६९८), शीव, मुंबई (फोन : ४०२ ३२२०)



Marathe Pratishthan

# सास्वा-सुनांचेच नव्हे, तर शब्दांचेही दिवस येतात!

- **अनंत धोंडो खांबेटे** (पृ.६९८), शीव, मुंबई (फोन : ४०२ ३२२०)

**'चार दिवस सासूचे नि चार दिवस सुनेचे' ही म्हण सुपरिचित आहे. तिचा वापर कुटुंबापुरता मर्यादित नसून सर्वव्यापी म्हणजे शब्द सृष्टीतही आहे.**

शब्दांच्या भाऊगर्दीत निरीक्षक दृष्टीनें पाहिले म्हणजे उपरोक्त म्हणीचा गमतीदार खेळ अनुभवता येतो. विस्तार भयास्तव काही मासलेवाईक शब्दांचा विचार करू.

**सम्राट** : ह्या शब्दाची शालेय जीवनात मौर्य, चंद्रगुप्त इ. च्या प्राचीन इतिहासासह सम्राट अशोकामुळे ओळख झाली. पुढे मराठी साहित्याच्या सर्व क्षेत्रांत समर्थपणे लेखणी चालविणाऱ्या कै. न. चिं. केळकरांना ही उपाधी चिकटली. येथपर्यंत ठीक! पण पुढे ह्या 'सम्राटाने' आपले खरे दात दाखविले. संपसम्राट, नटसम्राट, लाडूसम्राट, शिक्षणसम्राट, साखरसम्राट असे पायलीचे पन्नास सम्राट उदयास आले.

**शिबीर** : ह्या 'शिबिराची' ओळख प्रथमतः महाभारतांतून, भगवद्गीतेद्वारा, रणांगणावर रथी-महारथी रणनीती आखण्यासाठी खलबतें करीत, अशा अर्थी झाली आणि आता शिबिरें सगळ्या विषयांची, सर्व वयोगटांची भरत असतात. बालनाट्यांपासून तहत राष्ट्रीय स्वयंसेवकांपर्यंत. त्या शिबिरांना कोणी कार्यशाळा म्हणून संबोधतात. वर्कशॉप संबोधन जास्त सुखावणारे.

**युद्धपातळी** : हा शब्द 'वॉर फूटींग' ह्या आंग्ल शब्दाचे भाषांतर. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात गेली पन्नास वर्षे, दारिद्र्य निवारण, साक्षरता प्रसार, गृह निर्माण, पाणी पुरवठा इ. राष्ट्रीय समस्या सोडवण्यासाठी युद्धपातळीवर शासन कार्यरत आहे.

**मंदिर** : मंदिर या पवित्र शब्दाची जेवढी म्हणून विटंबना झाली असेल तेवढी कोणत्याच शब्दाची झाली नाही. केशकर्तन कला मंदिरापासून, हिट नि हॉट नाटकं दाखविणाऱ्या शिवाजी नाट्य मंदिरापर्यंत!

**जनता** : जनता ह्या शब्दाचा जन्म तसा स्वातंत्र्योत्तर कालानंतरचाच. हा शब्द फार बोकाळला - जनता साबण, जनात आगगाडी, जनता भोजन थाळी, जनता लुंगीनंतर तर १९७६ साली जनता पक्षाचे केंद्रात सरकार झाले!

**केंद्र** : हा शब्द उच्चारताच वर्तुळ, त्याचा परीघ आणि केंद्रस्थानी असलेला केंद्र बिंदू डोळ्यापुढे येतो. पण प्रत्यक्षात 'दुकान' हा त्याचा रूढार्थ आहे. आंग्ल भाषेच्या वरचष्म्यामुळे सेंटरने केंद्राला परिघाबाहेर ढकलले. मिल्क सेंटर, ज्यूस सेंटर, वडापाव सेंटर, फटाका सेंटर, झेरॉक्स सेंटर, आयडेंटिटी फोटो सेंटर, पूजा साहित्य सेंटर, मॅचिंग ब्लाऊझ सेंटर, चणा कुरमुरा सेंटर, फॅन्सी साडी सेंटर, न्यू बॉर्न बेबी सेंटर (मॅटर्निटी ऐवजी) इ. इ. तात्पर्य या सेंटरने मानवाच्या उत्पत्तीपासून त्याच्या अंत्यविधी साहित्य सेंटर (कूपर रुग्णालयाच्या आवारात शिरतानाच पहा) पर्यंत मजल मारली आहे. ह्या अंत्यविधी सामान केंद्राचाच अंत पाहण्याची वेळ दुकानदारावर आली असती, पण आंग्ल शब्दाचा प्रभाव जाणून इतरांप्रमाणे त्यानेहि पाटीवर केंद्राचे 'सेंटर' केले मात्र; आणि अहो आश्चर्यम्! अंत्यविधी सामानाचा तो जणू सम्राटच झाला!!

वास्तवतः ह्या केंद्राचा सर्वव्यापी अंमल ध्यानी घेऊन प्रस्तुतच्या लेखात मी ह्या शब्दाला केंद्रस्थानी न ठेवता अग्रस्थान द्यावयास हवे होते. पण तसे करण्याने 'सम्राट' शब्दाची शान राहती का?

उपरोक्त विवेचनाअंती सूज्ञांच्या ध्यानी आले असेलच की सम्राट, शिबिर, युद्धपातळी, मंदिर, जनता आणि केंद्र वा तत्सम शब्द, त्यांची ज्ञात पार्श्वभूमी टाकून नूतन अर्थानें जन मानसी रुजले. पण, याचेही आश्चर्य वाटावयास नको.

पूर्वीच्या जमान्यांत सासू शब्दाचा काय तो दरारा! सर्व सुना टरकायच्या!! अन् आता सुनांनी, सासूची 'अहो आई' केल्यामुळे सगळा मामला नरमलाय! हीच गत सम्राटादिकांची झाली. अन्यथा सम्राट, केंद्र, शिबिर, मंदिर, जनता हे सर्व मोडीत काढलेले शब्द ठरते ना! मंदिरातून देवा-दिकांच्या मूर्तीच्या ठायी बालनर्तिका, बालनट, हजाम, हलवाई हिट् नि हॉट नाटके होती ना!!

या सर्व कल्लोळात आंग्ल भाषेच्या प्रभावानें बरीच स्थित्यंतरे घडत आली आणि घडत आहेत!! आता खेडूत सिनेमाला न जाता पिक्चरला जातो. दूरदर्शनवर 'आमची माती आमची माणसं' मधली म्हाळसाबाई ब्री, बियाणें न म्हणतां चक्क षीड म्हणते! आता बोला !!

पूर्वी समारंभ नुसते पार पडत असत. अलीकडे पारितोषिक वितरण समारंभ, मान्यवर शेठ घेलाभाई नामचंद यांच्या अध्यक्षतेखाली 'संपन्न' होतो. बहुगुणी व्यक्तींच्या बाबतीतच संपन्नतेना वापर होई!

'गेट टुगेदर'नें संमेलनाला गेटाच्या बाहेर हाकलले! 'प्रॉब्लेम'ने तर समस्या, प्रश्न ह्यांना अडगणीत आणले. सोपे, परिचित मराठी शब्द उपलब्ध असताना, आंग्ल शब्दांच्या मोहापायी आजची तरुण मंडळी 'काय सॉलीड पाऊस पडलाय' असेही म्हणतात. हे थोडे विषयांतर, पण ओघाने उल्लेखिले.

एकंदरीत, ह्या शब्द सृष्टीतही खो-खो चा खेळ चालू असतो. तो न्याहळण्यात मनोरंजन तर होतेच पण त्याचबरोबर समाज-मनाचाही सुगावा लागतो!



Marathe Pratishthan

# स्मृती सुगंध

- **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई (फोन : ५१६ ३९०७)

**नोकरीच्या प्रदीर्घ काळात आलेल्या अनेक भल्या-बुऱ्या अनुभवांचे समृद्ध भांडार 'गभां'कडे आहे. त्यातल्या निवडक अनुभवांचे निर्विष, विनोदी किस्से 'दिवाळीचा फराळ' म्हणून इष्ट मित्रांना पाठवणे हि त्यांची खासियत!**

**गेल्या दिवाळीत फराळाऐवजी रुचिपालट म्हणून त्यांनी पाठवलेल्या 'स्मृतिसुगंधा'चा घमघमाट आपणा सर्वांपर्यंत पोचला तर द्विगुणितच नव्हे, तर सहस्त्रगुणित होईल अशी खात्री वाटते - संपादक.**

दरवर्षी दिवाळी आली की,आपण फराळा व्यतिरिक्त, एखादे अत्तर, साबण, उटणे वगैरे कितीही महागाई असली तरी खरेदी करतो. यंदा दिवाळीच्या शुभेच्छा म्हणून माझ्या ६८ वर्षाच्या जीवनात अनुभवलेले थोडेसे 'स्मृतीसुगंध' आपणापर्यंत पोहचवावे असे वाटते.

अलिकडेच दिवंगत झालेले प्रा. राम जोशी १९४९-५१ मध्ये आम्हाला बी. कॉम. ला अर्थशास्त्र शिकवीत असत. त्यावेळी बी.ए. होऊन 'फेलो' म्हणून एम. ए. चा अभ्यास करत होते. आमच्यापेक्षा चार वर्षांनीच मोठे होते. त्यांना विनोदबुद्धी होती. अर्थशास्त्रातील गहन तत्वे ते सोपी करून सांगत. Optimum ही कल्पना सांगताना ते म्हणाले की, ही एक अशी पातळी आहे की, त्याच्याहून कमी किंवा जास्त असणे बरोबर नाही. नंतर गंमतीत म्हणाले की, एखादी तरुण मुलगी, इतकी बांधेसूद व आकर्षक असते की, त्याहून अधिक जाड किंवा बारीक असेल तर तिचा गोडवाच जाईल. मागणी, पुरवठा आणि किमती याचे उदाहरण म्हणून युद्धकाळात इंग्लंडमध्ये सिगरेटच्या थोटकालाही किंमत होती हे सांगितले.

यावरून शं. वा. किर्लोस्करांच्या 'मांडवातील गमती-जमती' या व्यंगचित्राची आठवण झाली. तेव्हा तांदुळाचा खूप तुटवडा होता. लग्नमंडपात सर्व पाहुणे 'शुभमंगल सावधान' म्हटल्यावर अक्षतेचे तांदूळ गोळा करायला धावत आहेत असे व्यंगचित्र त्यांनी काढले होते.

शिक्षण व्यवसायांत विशेषतः शाळेमध्ये खूप गुडवील असते. विद्यार्थी मोठेपणीसुद्धा शिक्षकांबद्दल कृतज्ञता बाळगतात. अलिकडेच अमेरिकेत स्थायिक झालेल्या एका भारतीय डॉक्टरांनी आपल्या प्राथमिक शाळेतील बाईंना विमानाने नेऊन त्यांना अमेरिका दाखविली व चार महिने ठेवून घेतले. 'मी आज जो आहे, त्याचे पुष्कळ श्रेय माझ्या आई-वडिलांबरोबर बाईंना आहे' असे ते म्हणत.

माझी पत्नी माध्यमिक शाळेत ३० वर्षे शिक्षिका होती. तिचे विद्यार्थी आता ओळखता येणार नाहीत इतके मोठे झालेले आहेत. ते भेटतात तेव्हा तिला मनापासून आनंद होतो. आम्ही परदेश प्रवासाला सहार विमानतळावर गेलो तेव्हा लगेचच एक पोलीस ऑफिसर आम्हाला बघून आला आणि बाई तुम्ही कोठे निघाला वगैरे चौकशी केली. तो हिचा २० वर्षापूर्वीचा विद्यार्थी होता. अर्थात् ओळखणे शक्य नव्हते. 'बाई, तुमच्यामुळे मला मराठी काव्याची आवड निर्माण झाली. तुम्ही शिकवलेली 'फुलराणी', 'सागरा प्राण तळमळला', 'गर्जा जय जयकार' ह्या कविता अजून आठवतात. आता तुम्ही दोघे स्वस्थ बसा. बोर्डींग पास, फॉरिन एक्स्चेंज, कस्टम, लगेज, सर्व मी पाहीन. तुम्ही फक्त घोषणा झाली की, विमानात बसायचे.' असे म्हणून आम्हाला व्ही. आय. पी. सारखी ट्रिटमेंट दिली. हा सलाम प्रेमाचा होता, सत्तेचा नव्हता.

ट्रॅफिक ऑफिसर म्हणून सुमारे १० वर्षे काम केले. या काळात 'खात्यांतर्गत चौकशी' करताना शंभर एक ड्रायव्हर, कंडक्टर यांना गंभीर प्रकरणांत डिसमिस करावे लागले असेल. त्याशिवाय शेकडो प्रकरणांत सस्पेन्शन, दंड आदि शिक्षा द्याव्या लागायच्या. मी एका कंडक्टरला वारंवार गैरहजर राहण्याबद्दल डिसमिस केले. पुढे तो कम्युनिस्ट पार्टीचा कार्यकर्ता म्हणून नगरसेवक होऊन, मी सहायक सचिव असताना बेस्ट समितीचा सदस्य झाला. मी काही त्यांना ओळखू शकलो नाही. त्याच्या बेस्टमधील पहिल्याच समितीच्या बैठकीत माझ्या बढतीचा प्रस्ताव समितीसमोर आला. त्यांनी त्याकरिता प्रायोरिटी मागितली व ठराव पास झाला. नंतर ते माझ्या केबिनमध्ये आले आणि माझे अभिनंदन करून म्हणाले, 'मराठे साहेब, वीस वर्षापूर्वी तुम्ही मला नोकरीतून बडतर्फ केले होते याची आठवण आहे का? अर्थात् तुमचा तो कर्तव्याचा भाग होता. माझ्या कम्युनिस्ट पक्षाच्या कामामुळे हजेरी नेहमीच खराब होती.' आयुष्यात असे योगायोग येतात. त्यांच्या मनाचा मोठेपणा मात्र प्रकर्षाने जाणवला.

एकदा महापालिकेच्या सभेमध्ये 'बेस्ट'वर सपाटून टीका झाली. जनरल मॅनेजरला ताबडतोब सभागृहात बोलवा अशी मागणी करण्यात आली. त्यावेळी जनरल मॅनेजर आय. ए. एस. अधिकारी होते. ते टेनिसपटू असून मॅचकरिता सी. सी. आय. ला गेले होते. ते बिचारे सी. सी. आय. मधून तसेच कॉर्पोरेशनमध्ये Sports च्या वेषात आले व सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. श्री. अप्पा पेंडसे हे एक रसिक नगरसेवक होते. ते गंमतीत म्हणाले, 'बरे झाले, जनरल मॅनेजर कुस्ती खेळायला गेले नव्हते. नाहीतर आखाड्यातून तसेच आले असते तर?' त्यावर कमिशनर हसून म्हणाले, कुस्ती खेळणारा माणूस, नगरसेवक, मंत्री, मुख्यमंत्री काहीही होऊ शकेल. पण I. A. S. होणे कठीण. त्यावर मात्र गदारोळ झाला. कमिशनरनी खुलासा केला की विनोद म्हणून ते असे म्हणाले आणि आपले शब्द मागे घेतले. महापौरांनी सांगितले की ही एक गंमतीची बाब म्हणून त्याकडे पहावे. सभेच्या मिनिटमध्ये फक्त 'जनरल मॅनेजर ताबडतोब आले व त्यांनी निराकरण केले त्याबद्दल आभार' असे लिहू या. मग प्रकरण मिटले.



Marathe Pratishthan

# चकवा

**- विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली.

**गेला अर्धा-पाऊण तास मी डॉक्टरांबरोबर बोलत होतो. त्यांची बोलण्याची पद्धतच अशी होती की समोरचा माणूस संमोहित होई. त्यांच्या कुटुंबाची हृदयस्पर्शी हकीकत ऐकून तर मी पुरता त्यांच्या आहारी गेलो होतो.**

मिशन हॉस्पिटलच्या औषधी दुकानाच्या काऊंटरसमोर रांगेत उभे असलेले सर्वजण गेला तासभर काऊंटर उघडण्याची वाट पाहात होते. मी सुद्धा तासभर त्याच रांगेत उभा होतो.

'साहेब, बराच वेळ लागेल काऊंटर उघडायला नाही का? औषधाच्या दुकानांनी दुपारची सुट्टी घेणे अजबच आहे. पेशंट अगोदरच कंटाळलेला असतो. त्यात ही मधली सुट्टी म्हणजे अगदी पेशंटचा अंतच! तुम्ही काय ई.एन.टी. मधून आला?' माझ्या मागे असलेल्या गृहस्थाने विचारले.

'नाही, मी ई.एन.टी. मधून नाही, ऑर्थेपिडिक्समधून आलो आहे. मधून मधून मानेचा त्रास होतो. गोळ्या चालू असेपर्यंत जरा बरे वाटते. पण दुखायला सुरवात झाली की परत केस पेपर, एक्सरे, गोळ्या, इंजेक्शने सुरू! तुम्ही कोणत्या डिपार्टमेंटमध्ये दाखवायला आला होता?'

'माझं कसलं आलं आहे कर्माचं डिपार्टमेंट! आमच्या नशिबी आलं आहे ते भोगतो आहे. या गोळ्या घेण्यासाठी आलो आहे!' असे म्हणून त्याने खिशातील कागद काढून माझ्यापुढे केला. त्या कागदावर लिहिलेले औषधाचे नाव वाचून मला काही कळणार नव्हते व मला त्यात काही स्वारस्य नव्हते. दुसऱ्याच्या आजाराची जास्त चौकशी करणे हे माझ्या दृष्टीने सभ्यपणात बसत नव्हते. कुणाला आवडतं अगर आवडत नाही. कुणाचे रोग काहीतरी भलतेच असू शकतात. उगाच जास्त चौकशी करून त्याला अडचणीत आणणे मला पसंत नव्हते. मी त्याने दिलेला कागद जरा बघितल्यासारखा करून 'राहू द्या' असे म्हणत त्याच्याकडे परत केला.

'साहेब, नाही कळले ना काही? तुमची औषधे घेऊन होऊ दे. मी तुम्हाला सर्व सांगतो. ही औषधे मी माझ्या दोन मुलांसाठी घेतली आहेत.' मी दिलेला कागद खिशात ठेवत त्या गृहस्थांनी उत्तर दिले.

माणूस तसा पन्नाशीचा दिसत होता. डोळ्यांना जाड फ्रेमचा चष्मा, लांब बाह्यांचा शर्ट पँटमध्ये खोचलेला, गळ्यात टाय, पायात पॉलिश केलेले नसले, तरी भारी किंमतीचे बूट, केस मेंदी लावून तांबडे केलेले व उलटे वळवलेले. त्याच्याकडे बघून तो आपल्या दोन मुलांसाठी गोळ्या घेतोय म्हणजे नक्की काय ते मला समजत नव्हते. या माणसाची मुले आता मोठी असली पाहिजेत. त्यांनी आपल्या वडिलांना औषधे आणण्याची पाळी आणली म्हणजे काहीतरी गंभीर आजार असला पाहिजे. मग तो दोघांना एकदम कसा झाला? असा मला प्रश्न पडला व थोडा विचार केल्यावर कदाचित त्याच्या मुलाची मुले म्हणजे त्याची नातवंडे आजारी असावीत अशी मला शंका आली.

'काय, नातवंडे आजारी आहेत वाटतं?' मी कुतूहलाने विचारले.

कोणत्याही आजोबांना आपल्या नातवंडांविषयी विचारले तर हवेच असते. अशी एखादी संधी आली की आपली नातवंडे किती उपद्व्यापी आहेत, काय काय कारभार करतात, उन्हा-पावसात खेळून, पाणी पिऊन कशी आजारी पडतात, अगदी ऐकत नाहीत इ. वर्णन करताना, काय सांगू अन् काय नको असे त्यांना होऊन जाते. नातवंडांविषयी तक्रार करताना, त्यांचे गोड कौतुकच चाललेले असते. या गृहस्थाकडून असेच कौतुक आपल्याला ऐकायला मिळेल असे मला वाटले होते.

गृहस्थाने काही क्षण माझ्याकडे नुसते बघितले व म्हणाला, 'नाही साहेब, तुम्ही म्हणता तसे भाग्य माझ्या वाट्याला आले असते तर मी अत्यंत नशीबवान ठरलो असतो. पण तसे नाही, आज माझ्यावर माझ्या मोठ्या मुलांसाठी औष नेण्याची पाळी आलेली आहे. तुमचा नंबर आल वाटतं. तुम्ही औषधे घेऊन जरा बाजूला थांब मी गोळ्या घेऊन आलोच. मला तुमच्याश बोलायचं आहे.' इतके बोलेपर्यंत त्याचा स्व गहिवरला होता व डोळ्यात पाणी आले होते त्याला डोळे पुसायला अवकाश देत मी औषधांच्य खिडकीकडे सरकलो.

त्या माणसाने मला 'बाजूला थांबा' म्हणू सांगितले होते. तो आपल्यामागे काही लचांड त लावणार नाही ना अशी शंका मनात आली होती जास्तीत जास्त तो काय करील? अर्धा-पाऊण तार आपला वेळ घेईल व आपली कर्मकहाणी आपल्याल ऐकवील. तेवढ्याने त्याला जर बरे वाटत असेल तर आपण नुसते ऐकून घ्यायला काय हरक आहे. असा विचार करून 'मी सायकल स्टँडवरू सायकल घेतो, तुम्ही तिकडे या' असे त्य गृहस्थाला सांगून मी सायकल स्टँडकडे निघालो मी सायकल घेऊन बाहेर पडेपर्यंत हातातील पिशवी सावरीत त्याने मला गाठले.

'सॉरी हं साहेब, तुम्हाला जरा तकलीप दिली. चला जरा चहा घेऊन फ्रेश होऊ या. असे म्हणून त्याने माझ्या सायकलचे हँडल डाव्य हाताने धरून समोरच्या हॉटेलकडे वळविले हॉटेलात गेल्यावर ऑर्डर देऊन त्याने मला जं हकीकत सांगितली ती ऐकून या माणसाने अस कोणते पाप केले असेल की देव त्याच्याशी अस क्रूर खेळ खेळतो असा मला प्रश्न पडला.

'साहेब, मी शहा, डॉक्टर शहा.' त्याने सांगण्यास सुरवात केली. 'येथून जवळच राहते मी. तेथे माझा मोठा वाडा आहे. खाली बिऱ्हाडे आहेत व माडीवरच्या सहा खोल्यांत आम्ही राहतो



Marathe Pratishthan

साहेब, आज तीस वर्षे मी प्रॅक्टीस करतो आहे. गेली चार वर्षे माझ्या मागे ग्रहपीडा लागली आहे. कौटुंबिक समस्यांनी मला धंद्यात लक्ष घालता येत नाही. धंदा बंद झाल्यामुळे घरची परिस्थिती डबघाईला आली आहे. घरी आम्ही दोघेजण नवराबायको, दोन मुले व दोन सुना एवढे राहतो.'

'लकी आहात की डॉक्टर! हम दो, हमारे दो, असा आनंदी संसार असावयास पाहिजे तुमचा, मुले काय करतात?' डॉक्टरांची मुले कदाचित फारशी शिकलेली नसतील, त्याचे दुःख असेल, ते व त्या अनुषंगाने आणखी काही विवंचना मला सांगण्यासाठी त्यांनी मला गाठले असेल असे मला वाटले. तसे असेल तर 'डॉक्टर, मुले शिकली नाहीत तर नाही. कमी शिक्षण घेऊनही जीवनात यशस्वी झालेल्या लोकांची उदाहरणे आपण बघतो की नाही? त्यांना एखाद्या धंद्यात रस असेल, तर जम बसवू द्या की.' असे म्हणून वेळ पडल्यास दोन-चार उदाहरणे द्यावयाची व त्यांचे मन हलके करावयाचे असे ठरवून 'काय शिकली आहेत मुले?' असा मी प्रश्न केला.

'माझी दोन्ही मुले ग्रॅज्युएट आहेत. एक सत्तावीस व दुसरा पंचवीस वर्षांचा, आमच्या समाजात मुलांची लग्ने लवकर होतात. मोठ्याचे दोन वर्षापूर्वी झाले व गेल्या वर्षी अगदी चांगली मुलगी सांगून आली म्हणून धाकट्याचा बार उडवून दिला. दोन्ही सुना अगदी एक नंबर आहेत. मॅट्रीकपर्यंत शिकलेल्या आहेत. घरचे चांगले आहे. दोन्ही जावा अगदी बहिणी शोभतात. म्हणूनच त्यांच्या वाट्याला समान दुःख आले असावे काय?' त्यांना पुढे बोलवेना.

'काय, सासुरवास वगैरे.......' त्यांच्या गहिवरल्या गळ्याला जरा पॉज मिळावा व त्यांनी सावरावे म्हणून मी विचारले.

'नाही नाही. सासुरवास वगैरे काही नाही. माझी बायको फार चांगली आहे. मुलीपेक्षाही जास्त लाड व कौतुक असते सुनांचे! पण आमचे दुर्दैव. दोन्ही मुले पार व्यसनांच्या आहारी गेली आहेत. रात्रं-दिवस पिऊन तर्र असतात. बापाच्या जिवावर त्यांची चैन चालू आहे. खायला-प्यायला भरपूर आहे. करमणुकीला हक्काची बायको आहे. दोघांनीही लाज सोडली आहे. त्यांना केव्हा बायकोची तल्लफ येईल ते सांगता येत नाही. निर्लज्जपणे आमच्यासमोरून बायकोला ओढून नेण्यास कमी करीत नाहीत.'

'बिचाऱ्या मुली नवऱ्यांनी चालविलेले हाल बिनबोभाट सोसतात. त्यांचे व्यसन सुटावे म्हणून बिचाऱ्यांनी उपास-तापास, नवस-सायास करण्याचे काही सोडलेले नाही. आम्हीसुद्धा दोन्ही मुलांना समजावण्याचे प्रयत्न केले. त्यांची चूक त्यांना कळतेय. तेवढ्यापुरते होय म्हणतात, पण पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. साहेब, तुम्हाला मी रांगेत बघितल्यापासून तुम्ही घरी येऊन मुलांची समजूत घातलीत तर ती तुमचे ऐकतील असे मला सारखे वाटत होते. तुम्ही येऊन त्यांच्याशी जरा बातचीत केलीत तर फार बरे होईल. बिचाऱ्या मुलींनाही जरा दिलासा मिळेल. तेव्हा माझ्याबरोबर पाच मिनिटे का होईना, घरी येऊन चला.' त्यांच्या प्रस्तावाला माझा होकार गृहीत धरून वेटरने टेबलावर ठेवलेले बिल घेऊन डॉक्टर उठलेसुद्धा!

गेला अर्धा-पाऊण तास मी डॉक्टरांबरोबर बोलत होतो. त्यांची व माझी ना ओळख ना पाळख. परंतु रांगेत गाठ पडल्यापासून या माणसाने माझ्यावर विलक्षण छाप पाडली होती. त्याची बोलण्याची पद्धतच अशी होती की समोरचा माणूस संमोहित होई. त्यामध्ये माझ्यापाशी काढलेला कौटुंबिक विषय व कुटुंबाची हृदयस्पर्शी हकीकत यांमुळे मी पुरता त्याच्या आहारी गेलो. आपल्या सांगण्यामुळे कोणाला बरे वाटत असेल तर तेवढे पुण्य करावे म्हणून अगर, डॉक्टरनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाला प्रतिसाद म्हणून मी त्यांच्याबरोबर चालू लागलो.

मुख्य रस्ता सोडून डावीकडे गल्लीत वळल्यावर डॉक्टरांच्या वाड्यापर्यंत आम्ही ओलांडून आलेली गलिच्छ वस्ती बघून यांचे बरोबर येण्यात आपण काही चूक तर केली नाही ना, अशी शंका येत होती.

आम्ही लाकडी जिन्याच्या पायऱ्या चढून हॉलमध्ये पोचलो. तोच तीन-चार तरुण मुली हॉलमधून आतमध्ये पळाल्याचे माझ्या लक्षात आले. मला हॉलमध्ये बसवून डॉक्टरमहाशय 'आलोच हं' म्हणून आतमध्ये गेले ते अजूनही बाहेर आले नव्हते. बहुतेक चहापाण्याची व्यवस्था करण्यात गुंतले असावेत. हॉलमध्ये मी एकटाच बसलो होतो व हॉलचे निरीक्षण करीत होतो. हॉल बऱ्यापैकी सजविला होता. भिंतीवर नट्यांची उघडी-नागडी चित्रे लावलेली होती. दारुड्या मुलांच्या घरात अशा चित्रांचे मला नवल वाटले नाही.

मी वयाने फार मोठा नव्हतो. दारुड्या मुलांना उपदेश करण्याइतपत अगर त्यांच्या बायकांना धीर देण्याइतपत तर नव्हतोच नव्हतो. उपदेशास कशी सुरवात करायची याची मी मनात जुळवा-जुळव करीत होतो. तोच हातात पाण्याचा ग्लास घेऊन एक तरुणी माझ्याजवळ येऊन उभी राहिली.

'बाबूजी, पाणी घ्या.' असे म्हणून तिने पाण्याचा ग्लास माझ्या हातात दिला. ती रूपाने सुंदर होती. साडी नेसली होती. नुकताच मेकअप करुन आल्याप्रमाणे तिच्या अंगाला सौम्य सुगंध येत होता. तिचा साडीचा पदर खांद्यावरून घसरलेला होता. उघडा पडलेला तंग ब्लाऊज झाकण्यासाठी तिने पदर सावरला नव्हता. त्यामुळे तिची छाती वर खाली होत असल्याचे स्पष्ट दिसत होते. तिने खाली वाकून मला नमस्कार करताना तिची नितळ उघडी पाठ माझे लक्ष वेधून घेत होती.

'मुली, नाव काय तुझं? तुझे मिस्टर कोठे आहेत? त्यांना जरा बाहेर बोलाव. मला त्यांच्याशी बोलावयाचे आहे.' असे म्हणून मी संभाषणास सुरवात केली. पण तिच्याकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. ती आतील दरवाजाच्या पडद्याकडे बघत होती. बहुतेक आतून कोणीतरी तिच्यावर नजर ठेवीत असावे, असे माझ्या लक्षात आले.

तेवढ्यात हातात चहाचा कप घेऊन डॉक्टर बाहेर आले. 'साहेब, ही थोरली, हिरा हिचे नाव. आता हा चहा घ्या व हिला चार धीराचे शब्द सांगा. मी जरा कोपऱ्यावरच्या दुकानातून सिगारेट घेऊन येतो.' असे मला सांगून व हिराला 'बाबूजींची व्यवस्था पहा' असे बजावून डॉक्टर निघून गेले.

'हे बघ मुली, तुझ्या नशिबाला आलेली



Marathe Pratishthan

ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. यातूनच मार्ग काढला पाहिजे. नवऱ्याला व्यसनापासून मुक्त करण्याचा बराचसा उपाय बाईच्या हातात असतो. जरा गोडीगुलाबीने घेत व्यसन कमी करता येईल. तुझ्या मिस्टरांना बोलाव. त्यांना मी समजावून सांगतो.' इ. उपदेश मी करीत असतानाच पलिकडच्या खोलीतून एक टीशर्ट घातलेला तरुण व तरुणी हातात हात घालून माझ्या समोरून पळत पळत बाहेर पडली. त्यांनी जाताना हिराला काही खूण केली. हिरा चटकन्, 'बाबूजी मला आत बोलावले आहे' म्हणत पळत आत गेली.

एकूणच तेथे काहीतरी गडबड झाली असावी असे माझ्या लक्षात आले. डॉक्टरचा तर पत्ताच नव्हता. पण दारुड्या लोकांच्या घरात अशी गडबड होणे विशेष नाही. आता तेथे थांबण्यात अर्थ नाही असे म्हणून मी घरी निघून आलो.

मी ज्या ठिकाणी गेलो होतो त्या ठिकाणी पोलिसांनी छापा घातला व कुंटणखाना चालविणाऱ्या तथाकथित डॉक्टरला अटक केल्याची बातमी दोन-तीन दिवसांनी वाचली. सदर गृहस्थ रेल्वे, स्टेशन, एस. टी. स्टँड, बाजार इ. ठिकाणी भूलथापा देऊन सज्जन लोकांना आपल्या घरी आणीत असे व त्यांच्याशी कॉलगर्लना लगट करावयास लावून ब्लॅकमेल करीत असे. असेही बातमीत म्हटले होते. मी ज्या दिवशी तेथे गेलो त्याच दिवशी तेथे हा छापा पडला होता.

डॉक्टरमहाशयांनी आपली दारुडी मुले, त्यांचे व्यसन, घरात सुना इत्यादिंची काल्पनिक कथा चांगलीच रचली व मला आपल्या वाक्‌कौशल्याने चांगले चकविले होते. परंतु हा चकवा पूर्ण करण्यास त्यांना वेळ मिळाला नाही हे त्यांचे दुर्दैव व मी त्यातून वाचलो हे माझे सुदैव! ✣✣✣

# शुभ बोल नाऱ्या...

- **अश्विनीकुमार दत्तात्रेय** (पृ.२७०), डोंबिवली

घरात एखादे शुभकार्य करायचे असले, की यजमानाच्या मनात अत्यंत अशुभ शंका येतात. कार्य निर्विघ्नपणे पार पडेल ना, या भीतीने मन अत्यंत कातर बनते. अशा वेळी घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे मन शकुन-अपशकुन या दृष्टीने साशंकपणे बघत असते. कुठे कावळा ओरडला, भिकारी अवेळी येऊन याचना करायला लागला, शिंक आली, हातातील भांडे खाली पडले, की आपल्या यजमानाच्या मनाचा थरकाप उडतो.

खरे तर प्रत्येक शुभकार्याची सुरवात अनिष्टाचा परिहार आणि इष्टाचे आवाहन करणाऱ्या धार्मिक विधींनी होते. ग्रहमख, पुण्याहवाचन, देवक स्थापना हे विधी याच हेतूंनी केले जातात. मंगल- तोरण, आंब्याची पाने, रांगोळ्या इत्यादी शुभसूचक गोष्टींनी मंडप सजवलेला असतो, पण कार्य पार पडेपर्यंत यजमानाचे मन काळजीने व्याकुळच असते. अशा वेळी कोणीतरी औचित्याला सोडून काहीतरी बोलतो, ''त्या अमक्याकडची भांडी आणली आहेत की काय मागून? तसं असेल तर सांभाळा. त्यांच्या घरात विधवा होण्याची परंपरा आहे!'' आता हे ऐकल्यावर यजमानाच्या मनात नाही नाही ते विकल्प येणारच! मग तो वैतागून म्हणतो, ''शुभ बोल रे नाऱ्या. तुला हे आत्ताच सांगायला कोणी सांगितले होते? जरा आजूबाजूला बघ आणि विचार करून बोल.''

पूर्वी सोयरसुतक, विटाळसेपण या गोष्टी काटेकोरपणे पाळल्या जात असत. तेव्हा तर शुभकार्याच्या वेळी अशा गोष्टींचा धसकाच घेतला जात असे. विशेषतः सुतकाची गोष्ट कळली तरी ती कोणी एकमेकांना सांगत नसत. शुभकार्य पार पडल्यावर मग ती गोष्ट उघड करून आंघोळ करीत, पण काही विघ्नसंतोषी माणसे अशा गोष्टी मोक्याच्या वेळी मुद्दाम बोलत, ''अहो, तुम्ही सुतकात असताना कार्य कसे करता?'' यजमान उडवाउडवीची उत्तरे देत. मग त्या व्यक्तीला अधिकच चेव चढून ती म्हणायची, ''असे कसे? तो तुमच्या दसक्यातला होता. आता संबंध दुरावले तरी तीन दिवस तरी सुतक पाळायला हवे आणि आज तर दुसराच दिवस आहे!''

यजमान म्हणायचा, ''शुभ बोल रे नाऱ्या. तुला बोलावले हीच चूक झाली. पण आल्यासारखे गप्प तरी बसायचे होते.''

'शुभ बोल रे नाऱ्या' या म्हणीचे पुढील पाठभेद आहेत.

१. शुभ बोल रे नाऱ्या, तो नाऱ्या बोल्या आग लग्या.
२. शुभ बोल रे नाऱ्या, मांडवाला आग लागली.
३. शुभ बोल रे नाऱ्या, तर बोडक्या होवोत साऱ्या.

या म्हणींमधला 'नाऱ्या' हा एका प्रवृत्तीचा अवतार आहे. ही प्रवृत्ती म्हणजे औचित्याला सोडून नको तेच नको त्या वेळी, नको त्या ठिकाणी बोलणे. अशा प्रवृत्तीच्या माणसांना 'फद्या' असेही म्हणतात. कोकणात या माणसांना आणि त्यांच्या बोलण्याला 'पचकणे' अशी संज्ञा आहे.

या म्हणीतली 'नाऱ्या' ही कोणी ऐतिहासिक व्यक्ती नाही, पण त्याच्या नावाचे स्पष्टीकरण द्यायला एक कथा निर्माण झाली आहे. एका गावात नाऱ्या नावाचा एक माणूस रहात होता. तो बोलेल ते खरे व्हायचे. पण नाऱ्या कधीच शुभ बोलत नसे. एकदा एका लग्नकार्यात आगंतुकपणे नाऱ्या हजर झाला. यजमान धास्तावून म्हणाला, ''नारोबा, आलाच आहात तर थोडे खा आणि मुकाट्याने निघून जा.'' त्यावर नाऱ्या म्हणाला, ''ठीक आहे. पिंडाएवढा भात खातो आणि देवळात जाऊन मेल्यासारखा झोपतो. मग इकडे नवरा मरो की नवरी मरो. मांडवाला आग लागली तरी उठणार नाही.''

तुकारामांनी आपल्या एका अभंगात 'नाऱ्या प्रवृत्ती' अशी दाखविली आहे-

मांडवाच्या दारा । पुढे आणिला म्हातारा ॥१॥
म्हणे नवरी आणा रांड। जाळा नवऱ्यांचे तोंड ॥२॥
समय न कळे। काय उपयोगी ये वेळे ॥३॥
तुका म्हणे खरा। येथूनिया दूर करा ॥४॥

वि. दि. नरवणे यांच्या 'भारतीय कहावतसंग्रह' या पुस्तकात 'शुभ बोल रे नाऱ्या' याला समांतर

पुढे-पृ. १२ वर



Marathe Pratishthan

# केवड्याचे कणीस

**- श्रीपाद माधव उर्फ आप्पा मराठे** (पृ.४६), रत्नागिरी

**बयोताई करारी आवाजात म्हणाली, 'माझे पति जाऊन दहा वर्षे झाली. त्यांच्या मागे मुलांना वाढवले, चांगले शिक्षण दिले, मुलीचे चांगले स्थळ बघून लग्न केले. सगळे कुलाचार व्यवस्थित चालवले. मुलापेक्षा मीच त्यांची खरी वारस आहे. मुलाऐवजी मी स्वतः त्यांचे श्राद्ध करण्यात काहीच गैर नाही!**

बयोताई गेले १०/१२ दिवस अस्वस्थच होती. तिचे नित्याचे व्यवहार सरावाप्रमाणे चालू होते. परंतु एकीकडे कामे सुरू असली तरी त्यात मन मात्र नव्हते.

बयोताई आपल्या घरी एकटीच रहात होती. आता ती पन्नाशीला आली होती. पण वयाच्या मानाने ती फार म्हातारी दिसायला लागली होती. तिचा नवरा एक उत्तम याज्ञिक होता. आसपासच्या १० गावात त्याची याज्ञिकी उत्तम प्रकारे चालत होती. गावात मान होता. प्रतिष्ठा होती. परंतु एकाएकी तिचा नवरा तिला सोडून गेला. तो दिवस तिच्या स्मरणात सदाचा राहिला होता.

त्या दिवशी सकाळी आपले नित्यकर्म उरकून तो बाहेर पडला होता आणि त्याच्या शेताच्या कडेला नदीच्या कोंडीत टाकलेले माडाच्या झावळांचे बिंडे वर काढण्याचे काम सुरू होते. त्या झावळांचे नंतर झाप वळायचे होते. पण वामनराव एकदम स्तब्ध उभे राहिले. वाऱ्याच्या झुळकीबरोबर त्यांच्या नाकापर्यंत एक सुगंध तरंगत आला होता. त्याच्यापासून १०/१२ पावलावर नदीच्या कोंडीच्या टोकाला केवड्याची झुडपे माजली होती. तिथूनच हा सुगंध येत होता. त्यांना बयोताईची आणि आपल्या लहानग्या मुलीची आठवण आली. त्यांना केवडा फार आवडत होता. त्यानी गड्याला हाक मारली, 'रे गणू, अरे, केवड्याचे कणीस फुललेले वाटते. मी कणीस काढून घेऊन येतो. तू आपले काम चालू ठेव.'

'अरे भाऊ, तुमी एकटे खंय चाललांव? अहो, तां केवड्याचा रान! कणीस काढताना पायाखाली काय गावला म्हंजे? होत्याचां नव्हतां होऊन जायल! मी पर येतां तुमच्या बरोबर, थांबा जरा, काठी घेऊन येतां.'

'बरं बाबा ये' असे म्हणून वामनराव केवड्याच्या रानात घुसले. त्यांना कणीस दिसले आणि ते एकदम ओरडले, 'डसले रे जनावर डसलें' एव्हडे म्हणून त्यांनी खाली उडी मारली आणि हात दाबून धरून खाली बसले तोवर गणूने जनावर हेरून त्यावर काठी टाकली. ते एकलहरें होते. गणूने वामनरावांना पाठुंगळीला मारून घरी आणले.

घरी आणल्यावर धावाधाव करून ५ मैलावरच्या डॉक्टरला आणण्यासाठी सायकलवरून मनुष्य गेला. तोपर्यंत मांत्रिकाकडून उपचार सुरूच होते. परंतु, 'मी तुमच्यासाठी, केवडा काढण्यासाठी गेलो, तिथे जनावर डसलें' एवढेच कसेबसे म्हणून वामनराव बेशुद्ध झाले. ते पुन्हा शुद्धीवर आलेच नाहीत. ते कणीस बयोताईने एका पेटीत ठेवून ती पेटी देवघरात ठेवली होती आणि पेटीवर रोज गंधफूल वाहून नमस्कार करीत आली होती.

आता वामनरावांचे श्राद्ध ८/१० दिवसांनंतर आले होते. त्यांच्या मुलाने या वर्षी श्राद्धाला यायला जमणार नसल्याचे कळविले होते. कारण त्यावेळी त्याला कंपनीच्या प्रशिक्षणासाठी मद्रासला जावे लागणार होते. त्यामुळेच बयोताई बेचैन होती. आता श्राद्ध होणार कसे? श्राद्ध कोण करणार? पुतणे होते, पण ते लांबचे! जावयाची श्राद्ध वगैरे गोष्टींवर श्रद्धा नव्हती. त्यामुळे त्याला गळ घालण्यात अर्थ नव्हता. काय वाटेल ते झाले तरी श्राद्ध झालेच पाहिजे असा तिचा निश्चय होता. नुसता ब्राह्मण जेवायला घालून तिचे समाधान होणार नव्हते. 'नातिचरामि' अशी शपथ तिच्या नवऱ्याने घेतली होती आणि ती शपथ आपल्याला सुद्धा लागू आहे अशी तिची धारणा होती. शेवटी हताश होऊन देवघरांतल्या कणसाच्या पेटीकडे नजर ठेवून विचार करीत बसली होती आणि वीज चमकल्यासारखा तिच्या डोक्यात एक विचार चमकला.

तिने केशव भटजींना घरी येऊन जाण्यासाठी निरोप पाठविला आणि दुसऱ्या दिवशी सुप्रभाती केशवभटजी त्यांच्याकडे आले.

'गुरुजी, ह्यांचे श्राद्ध ८/१० दिवसांवर आले.' बयोताई म्हणाली.

'अहो, माझ्या लक्षात आहे. अगदी आठवणीने निरोपाशिवाय मी येतोच आहे ना? यंदाच निरोप पाठवायचे काय कारण?' गुरुजींनी विचारले.

'अहो, तशीच अडचण असल्याशिवाय मी निरोप पाठवीन का? तुम्हाला माहिती आहे गुरुजी, सर्व काही व्यवस्थित करायचा ह्यांचा स्वभाव होता.' बयोताई सांगू लागली.

---

**शुभ बोल नाऱ्या.....** (पृ. ११ वरून)

अन्य भाषिक म्हणी नाहीत, पण शोध घेतला, तर इतर प्रांतातही 'नाऱ्या' आढळून येईल. गुजराथी नाऱ्याचा अवतार असा आहे. 'बार बरस बाबा बोले जाव बेटा तेरा सत्यानास होवे.' एक महाराज बारा वर्षे मौन पाळून बसले होते. बारा वर्षांच्या अखेरीला ते काय म्हणतात हे ऐकायला लोक उत्सुक झाले होते, पण आपल्या शिष्याच्या अंगावर खेकसत ते बोलले, 'जा बेटा तुझा सत्यानाश होईल.'

अशा वेळी काय म्हणणार? अर्थात 'शुभ बोल नाऱ्या'. (आभार : सकाळ, पुणे २५.५.९८)



Marathe Pratishthan

'काय बोलणे हे बयोताई? अहो, वामनरावांसारखा उत्तम याज्ञिक उभ्या दशक्रोशीत अजूनपर्यंत झाला नाही. त्यांची याज्ञिकी माझ्याकडे आली आहे. पण बरेच यजमान वामनरावांची अजूनही आठवण काढतात.' वामनरावांच्या आठवणीने गुरुजींना भरून आले. त्यांनी डोळ्यांना पंचा लावला.

बयोताई स्तब्ध झाली. तिच्या मनात सुद्धा आठवणींनी गर्दी केली होती. घसा साफ करीत ती म्हणाली,'यंदा आमच्या बंड्याला श्राद्धाला यायला वेळ नाही. तो कंपनीच्या कामाला मद्रासला जाणार आहे. यंदा श्राद्ध कसे व्हायचे हा माझ्यापुढे प्रश्नच आहे.'

'अहो, त्याचं काय एव्हढे? तुमच्या जावयाला बोलवा. त्याचा अधिकारच आहे तो!' गुरुजींनी सुचवले.

'काय सांगू गुरुजी तुम्हाला? जावयांचा श्राद्ध वगैरे गोष्टींवर विश्वास नाही. माझ्या शब्दासाठी येतील सुद्धा ते! पण कोणावर बळजबरी करायची माझी इच्छा नाही.'

'मग, ब्राह्मण जेवायला घाला आणि दक्षिणा द्या आणि नमस्कार करा म्हणजे झालें, आपल्या धर्मात सगळ्या गोष्टींना पर्याय आहे.' गुरुजींनी तोडगा काढला.

'मला माहीत नाही का गुरुजी? श्राद्धाचे अनेक प्रकार आहेत. अगदी दक्षिण दिशेकडे तोंड करून ज्योत पेटवून मोठ्याने मृताचे नाव घेतले तरी श्राद्ध होते.' बयोताईंने सांगितले.

'वामनरावांच्या पत्नी तुम्ही! तुम्हाला माहीत नसायला काय झाले? पण मी आपले सुचविले हो!'

'तुम्हाला ठाऊक आहे ना गुरुजी, ह्यांना सगळ्या गोष्टी अगदी व्यवस्थित, साग्रसंगीत झालेल्या हव्या असायच्या. जरा इकडे-तिकडे झालेले खपत नसे. मग त्यांचे श्राद्ध तसेच व्हायला नको का? मी मार्ग काढला आहे. तुम्ही फक्त त्या दिवशी आणखी एका ब्राह्मणाला घेऊन सकाळी दहा वाजता या. कराल ना एव्हढे?' बयोताईंने विचारले.

'असे काय करता बयोताई? आठवण न करता आठवणीने येणारा मी. तुम्ही एवढे सांगून सुद्धा येणार नाही असे कसे होईल?' असे म्हणून गुरुजी चहा घेऊन निघून गेले.

बयोताईंने सुस्कारा सोडला आणि सगळी रोजची कामे उरकून दुपारी निवांतपणे ती आपल्या मैत्रिणीला पत्र लिहायला बसली. तिच्या मैत्रिणीचे नाव नीलांबरी. पुण्याला ती स्वतःच्या हिंमतीवर धंदाउद्योग करीत होती. नवरा खासगी कंपनीत हुद्देदार होताच. पण तिचा स्वभावच धडपड्या असल्याने ती स्वतःचा उद्योग करीत होती. शिवाय सामाजिक कार्यही करीत असे. बयोताईंने तिला सर्व हकीकत विश्वासाने लिहिली आणि पुण्याला आता बायकासुद्धा श्राद्ध पूजा असली धार्मिक कृत्ये करतात. त्यापैकी एकीला तिने पाठवून द्यायला सांगितले. त्याप्रमाणे श्राद्धाच्या आधी २ दिवस सौ. मालतीबाई परांजपे बयोताईकडे मुक्कामाला आल्या. त्या सर्वसाधारण याज्ञिकी शिकल्या होत्या. श्राद्धाचे पौरोहित्य त्या करू शकत होत्या.

बयोताईंने गुरुजींना बोलावणे पाठविले. त्यांना मालतीबाईंची ओळख करून दिली आणि म्हणाली,'गुरुजी श्राद्ध व्यवस्थित झाले पाहिजे. मी स्वतः श्राद्धाला बसणार आहे आणि या मालतीबाई श्राद्ध चालविणार आहेत. मी बसले तर तुम्ही श्राद्ध चालवणार नाही याची मला खात्री आहे. तुम्ही फक्त एक ब्राह्मण बरोबर घेऊन यायचे आहे.'

गुरुजींनी आ वासला. बराच वेळ त्यांचे तोंड मिटेना. शेवटी भानावर येऊन घसा खाकरून म्हणाले,'काय ऐकले मी हे? शिवशिव, कधी न ऐकलेले, कधी न बघितलेले, कधी न वाचलेले! हे अघटितच आहे. विधवा बाईने श्राद्धाला बसावे आणि एका बाईने चालवावे? छे, आपल्यास नाही हे पटत!! याला शास्त्राधार तरी काय? धर्मसिंधू, निर्णयसिंधू मी कामापुरते वाचले आहेत पण मला त्यात असे काही वाचल्याचे आठवत नाही. मालतीबाई तुम्ही तरी सांगा काय शास्त्राधार आहे तो!'

'हे बघा गुरुजी, मालतीबाई फक्त श्राध्द चालविणार आहेत. शास्त्राधार बघण्याचे त्यांचे काम नाही. शास्त्राधार मी सांगते' बयोबाई करारी आवाजात म्हणाली. 'हे बघा, माझे पती जाऊन दहा वर्षे झाली. त्यांच्यामागे मुलांना लग्न करून दिले. पतीचे नित्य नेमाने स्मरण करीत राहिले. सगळे कुलाचार व्यवस्थित चालविले. त्यांची खरी वारस मुलग्यापेक्षा मीच आहे. पत्नी पतीचे अर्धांगच असते म्हणून मी स्वतः त्यांचे श्राद्ध करण्यात गैर काही नाही. मालतीबाई श्राद्ध चालविणार आणि मी श्राद्धाला बसणार. तुम्ही फक्त जेवायचे, दक्षिणा घ्यायची आणि आशीर्वाद द्यायचे. तुम्ही त्यांच्या भावासारखे आहात. तुम्ही नाही म्हणूच शकत नाही.'

गुरुजी अगतिकपणे म्हणाले,'श्राद्ध परवाच्या दिवशी आहे. मी तुम्हाला उद्या सकाळपर्यंत विचार करून काय ते सांगतो.'

गुरुजी घरी गेले. रोजची कामे केली. पण त्यांच्या मनांतून विचार जाईना. स्वतः गुरुजींना दोन मुलीच होत्या. दोघींचीही लग्नें झाली होती. जर आपले श्राद्ध कोण करणार असा विचार त्यांच्या मनात तीव्रतेने आला. जो जो ते विचार करू लागले. तो-तो बयोताईचे मत त्यांना पटू लागले. दुसऱ्या दिवशी ते बयोताईंकडे जाऊन 'श्राद्धाला येतो' असे सांगून आले.

मालतीबाईंनी यथासांग श्राद्ध चालविले. बयोताईंने ते यथासांग केले. गुरुजींनी त्यात मनापासून भाग घेतला आणि जाताना म्हणाले,'बयोताई, यंदा तुम्ही श्राद्ध चालवायला मालतीबाईंना बोलावलेत, ठीक केलेत. पण पुन्हा अशी अडचण आली तर तुम्ही श्राद्धाला बसा, मी स्वतः श्राद्ध चालवायला बसेन.'

बयोताईंचा गळा भरून आला. ती देवघरात गेली. केवड्याच्या कणसाच्या पेटीकडे एकटक बघत नमस्कार केला. वामनरावच हसऱ्या चेहऱ्याने आशीर्वाद देत आहेत असा तिला भास झाला.

+++



Marathe Pratishthan

# दक्षिण कन्नडातील चित्पावन

- एम. प्रभाकर जोशी

**दक्षिण कानडामध्ये स्थायिक झालेले कपिगोत्री मराठे कारकल, माळ, शिशिल, दुर्ग इत्यादी ठिकाणी मोठ्या संख्येने आहेत. कारकल तालुक्यातल्या दुर्ग गावातले पाच मराठे कुटुंबीय मागील ऑक्टोबर मध्ये रत्नागिरीत झालेल्या आपल्या संमेलनाला आवर्जून उपस्थित राहिले. संमेलनानंतर रत्नागिरीत राहून सुमारे दोनशे वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज रहात असलेल्या मूळ गावी जाऊन आले.**

**त्यांचे याबाबतचे पत्र हितगुजच्या डिसेंबर १९९७ संमेलन विषेशांकात छापले आहे. आपल्या मूळ गावी गेल्यावर आणि कुलबांधवांना भेटल्यावर त्यांना झालेल्या आनंदाचा प्रत्यय त्यांच्या या पत्रातून येतो. आपल्या कानडावासी कुलबांधवांनी आपल्या चालीरिती, रुढी व परंपरा इतकेच नव्हे तर भाषाही अजून जपली आहे हे वाचून आपल्यालाही निश्चितच आनंद वाटेल. दक्षिण कानाडतल्या कोकणस्थांबाबतचा श्री. जोशी यांचा हा लेख मुंबई येथील महाराष्ट्र टाईम्सच्या १८.११.८४ च्या अंकातून साभार पुनर्मुद्रित केला आहे. - संपादक.**

कर्नाटकाच्या दक्षिण कन्नड (मंगळूर) जिल्ह्यात गेल्या कित्येक वर्षांपासून जवळ जवळ पाच हजार चित्पावन ब्राह्मण त्यांच्या परंपरागत वैशिष्ट्यांनिशी वस्ती करून आहेत. ही माहिती कदाचित अनेक मराठी माणसांना नवी वाटेल.

दक्षिण कन्नड जिल्ह्यात चार मोठ्या आणि सहा-सात लहान चित्पावन वसाहती आहेत. या वसाहती किनारपट्टीलगत नसून घाटमाथ्यावर आहेत. हे एक त्यांचे वैशिष्ट्य.

कार्कळ तालुक्यातल्या बाळग्राम, दुर्गग्राम, ईडु, गंगेनिरु, हजी या गावात, वेलतंगडी तालुक्यातल्या मुंडाजे, शिशिल, हत्यडक, शिवाजे, निडले, खुळबेट्टु, कंडिजे, जरुवा, बंगाडी, होसमठ आणि कुंदापूर तालुक्यात हालाडी येथे चित्पावनांची वस्ती आहे. अलिकडे मंगळूरसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीही चित्पावनांची घरे आढळू लागली आहेत. जिल्ह्यातील चित्पावनांच्या घरांची संख्या पाचशेपेक्षा अधिक आहे.

**कानडी चित्पावन आडनावे**

या भागास चित्पावनांची ४९ आडनावे प्रचलित आहेत. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील चित्पावनांची आडनावेच दक्षिण कन्नडातील चित्पावनांनी कायम ठेवली आहेत. परंतु या आडनावांच्या उच्चारावर कानडीचा बराच प्रभाव पडला आहे. उदाहरणार्थ - बापटचे बप्पड, ताम्भनकर, चिप्पणकर, दाम्बुले वगैरे.

या भागात चित्पावन केव्हा आले, कोणत्या मार्गाने आले आणि ते या भागात येण्याची कारणे काय हे अद्याप संशोधनानेच विषय आहेत. परंतु पोर्तुगिजांच्या धर्मछळाच्या भीतीने, मुसलमानी आक्रमणाला घाबरून किंवा दुष्काळ अथवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा उपजीविकेसाठी चित्पावन कोकण, गोवा भागातून येथे आले असावेत असा तर्क आहे.

**पोर्तुगीजांच्या आधी?**

अर्थात पोर्तुगिजांकडून होणारा धर्मछळ सारस्वत, राजापुरी, कुणबी, कुडाळदेशकर, गावडे, कऱ्हाडे आदींच्या दक्षिण कन्नडातील स्थलांतरास कारणीभूत आहे. परंतु चित्पावनांवर पोर्तुगीज संस्कृतीचा कोणताही प्रभाव दिसत नाही. उलट भाषाशास्त्रीय पुरावा लक्षात घेतला तर हे चित्पावन पोर्तुगीज येण्याच्या आधीच येथे येऊन स्थायिक झाले असावेत, असा तर्क करता येतो.

उदाहरणच द्यायचे झाले तर येथले चित्पावन उत्तम वस्तुंना 'गोवे' हे विशेषण लावतात. आपल्याकडे ज्याप्रमाणे उत्तम वस्तूला विलायती, इंग्रजी (विलायती कोंबडी, इंग्रजी कुत्रा इ.) विशेषण लावतात तसेच. हे लोक 'गोवे आंबे', 'गोवे गाय', आदी शब्दप्रयोग करतात.

शृंगेरी मठाच्या प्रोत्साहनाने चित्पावन इकडे आले असावेत असा एक तर्क चित्पावन लेखक कै. चाफेकर यांनी मांडला आहे. परंतु त्याला सबळ पुरावा नाही.

द. कन्नडातील चित्पावनी मात्र गोव्यातील कोकणी प्रभारित चित्पावनीपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे हे लोक राजापूर-रत्नागिरी या भागातून इकडे आले असावेत असाही तर्क आहे.

या भागात गोखल्यांचे एक घराणे आहे. हे घराणे 'ओणीचे गोखले' म्हणून ओळखले जाते. गोखल्यांचे हे ओणी गाव इकडच्या भागात कुठेही आढळत नाही. चिपळूणजवळ मात्र एक 'ओणी' आहे व तेथे बरीच चित्पावन घरे आहेत.

**दहा-बारा पिढ्या**

येथे काही घराण्यात दहा-बारा पिढ्यांचा उल्लेख मिळतो. म्हणजे जवळ जवळ चार-साडेचारशे वर्षांपासून, म्हणजेच पोर्तुगिजांच्या आधीपासून चित्पावन या भागात आहेत असे अनुमान काढता येते. हे आगमन थोडेथोडके नसून मोठ्या प्रमाणावर झाले असावे असाही अंदाज

Marathe Pratishthan

## भाषेवर कानडी प्रभाव

या चित्पावनांनी अद्याप आपली मराठी भाषा जतन केली आहे. परंतु ती कानडीच्या प्रभावापासून मुक्त राहिलेली नाही. त्यात जागोजागी कानडी हेल येतात. या भाषेचा एक नमुनाच बघा. - 'हे आमचं घऽऽर, आमचे आज्जोबानं बांधटलेले. ते काळात पंध्रा हजार रुप्पये खर्चले म्हणि ल्यहोनि ठेयलन त्से. दुर्बळपणांतु तेई केल्लेली साधऽऽन मोहि म्हणवं. घराची माळी मजबूत त्से. माळावरि पोष्कळ घाल्लने प्रत्येक व्यवस्था त्से. आंतु घरांतु उज्जीडु उणो झालो म्हणि आम्ही गेल्ले वर्खा खिडकी मोठ्ठि करयेईली. माग्गिलदारा पळा एक घाट्टणे त्से, तेला संभोर वर्ख झाली म्हणि दादा म्हणल्से.'

आहे. कारण येथे सगोत्र, सप्रवर विवाहांचे एकही उदाहरण आढळत नाही. याचा अर्थ एवढाच की येथे सर्व गोत्रांचे चित्पावन मोठ्या संख्येने आहेत.

ही चित्पावन घराणी एकाच वेळी इकडे आली की वेगवेगळ्या वेळी आली याबाबतही मतभिन्नता आहे. मुंडाजेचे भिडे, फडके ही घराणी देशावरून आलेली. (याबाबत स्पष्ट पुरावा आहे.) रानडे नंतर आले. शिशिलेचे दामले दीडशे वर्षांपूर्वी रत्नागिरीहून आले. पुण्याहून येथे येऊन स्थायिक झालेल्या चित्पावनांची वाडी आजही पुणेकरांची वाडी म्हणून ओळखली जाते. असे असले तरी चित्पावनांचे आगमन प्रामुख्याने चार-पाचशे वर्षांपूर्वीच झालेले असावे.

या आगमनाबाबत असेही सांगितले जाते की, समुद्रमार्गाने चित्पावनांचे दोन गट आले. एक गट उडुपीजवळ मलपे या गावी आणि दुसरा मंगळूरला उतरला. मलपे बंदरावर आलेले उडुपीजवळच्या हिरियडक गावात प्रथम स्थायिक झाले. मंगळूरला आलेले वेखाळज़वळच्या पुंजालकट्टे गावात राहिले. हिरियडकवाल्यांनी उत्तम जागांचा शोध घेतला आणि हालाडी, माळ, दुर्ग या ठिकाणी ते गेले. आता हालाडीत फक्त एक-दोन घरेच शिल्लक आहेत. पुंजालकट्टे भागात सर्वभक्षी गिधाडांचा भयानक त्रास झाल्यामुळे तेथले चित्पावन शिशिल, होसमठ, मुंडाजे येथे जाऊन राहिले व सर्वांनी शांत ठिकाणी जीवन व्यतीत करण्यास सुरवात केली. बहुतेकांनी सुपारीच्या बागा लावून त्यावर उदरनिर्वाह सुरू केला.

**वैशिष्ठ्ये कायम**

चित्पावनांच्या या बहुतेक वसाहती दुर्गम प्रदेशात आहेत. आजही कित्येक ठिकाणी पोहोचणे अवघड आहे. परंतु त्यांनी झाडे कापून जागा तयार केली व कष्टपूर्वक घरांची उभारणी केली व तसे करताना आपली सर्व चित्पावनी वैशिष्ट्ये कायम ठेवली. कोकणातल्या चित्पावनांप्रमाणेच चौकटीचे घर, घरात झोपाळा. त्याशिवाय आहारात तिखट कमी, गोड जास्त, पालेभाज्या-फळांचा वापर इ. वैशिष्ट्ये कायम आहेत. भातात मात्र उकड्या तांदळाऐवजी सर्वत्र उपलब्ध असलेल्या तांदळाचाच वापर आहे. भात हे इकडेही त्यांचे मुख्य अन्न आहे. अग्रस, मुठ्ये, करंजी, उंडरे, उंडे, पातळ्या, फेण्यो, आत्ताली, घावण, घरवडी, आप्पे, सुरवे, पिठाचे दंड्डे, पुरणाची पोळी, फणसाचे उंबर, घारियो, सांदण, हालवाई (तांदळाचा हलवा), उक्कडगरे, खिचडी, सुकनुंडे, चकल्या, आंबट, भात, तांदळाची भाकरी, टाळक्याचे दोसे आदी पारंपारिक चित्पावनी व नव्याने स्वीकारलेले पदार्थही त्यांच्या जेवणात आढळतात. 'फणसाचे आड्डवत' नावाचा एक पदार्थ त्यांच्यात बराच लोकप्रिय आहे. आंबे, फणसाची आवड त्यांच्यात जरा विशेषच.

पापड, सुकेळी, पाण्यात ठेवलेले आंबे, पाण्यात घातलेले फणस, काचऱ्या, फणसाची आठळी, वडे खंड, आगवळाच्या मिर्च्या, आंब्याचा रस सुकवून केलेले कुमांच, सुकवलेले पक्के गरे, रातांबे हे सर्व उन्हाळ्यात तयार करून पावसाळ्यासाठी ठेवले जाणारे पदार्थ. चित्पावनांचे पापड आणि लोणचे उत्कृष्ट मानली जातात. या भागातले अन्य लोक या पदार्थांची मुक्तकंठाने प्रशंसा करतात.

पूर्वी मुलांना सकाळी न्याहारीसोबत जिरे व कोथिंबिरीचा काढा प्यायला देत पण आता चहा, कॉफीने त्यांची जागा घेतली आहे.

**पारंपारिक वेशभूषा**

पोशाखाच्याबाबतीत हा समाज अद्याप काहीसा परंपरावादी आहे. परंतु पुरुषांच्या पोशाखावर बरीचशी कानडी छाप आहे. पूर्वी मराठी पद्धतीचे पागोटे, कोट व धोतर असा पोशाख असे. स्त्रिया मात्र अद्याप नऊवारी लुगडेच परिधान करतात. काही ठिकाणी पाचवारी साड्या नेसण्यास प्रारंभ झाला आहे. पण समाजात ते घरंदाजपणाचे मानले जात नाही.

चित्पावन महाराष्ट्रात कोकणस्थ म्हणूनही ओळखले जातात. पण या भागात कोकणस्थ आहेत ते गौड सारस्वत आणि राजापुरी. त्यांना कोकणे असेही संबोधिले जाते. चित्पावन मात्र चित्पावन, चिप्पाळणे, चिप्पणे, चिप्पे इ. नावांनी ओळखले जातात.

द. कन्नडातील हे सर्व चित्पावन प्रामुख्याने शेती करतात. मुख्य उत्पन्न सुपारीचे आहे. त्याबरोबर नारळ, मिरी, आंबे यांचीही लागवड केली जाते. काही लोक भाताचे पीकही घेतात. परन्तु त्याचे प्रमाण कमी. आता कोको, काजू (गोडंबी) यांची लागवड सुरू झाली आहे.

असे असले तरी मोठे बागायतदार चित्पावन बोटावर मोजण्याएवढेच मिळतील. बाकी सर्व मध्यम व लहान शेतकरी आहेत. त्यांची शेतीही मागासलेल्या स्वरूपाची आहे. पण अलिकडे तरुण चित्पावन प्रगतिशील शेतीकडे वळू लागले आहेत. बहुतेकजण कष्टाळू आहेत.

याशिवाय आता चित्पावन प्राध्यापकी, वैद्यकी, अभियांत्रिकी, बैंकिंग, उद्योग, लष्करी, व्यापारी, सरकारी नोकरी, वकिली, पत्रव्यवसाय यांतही शिरले आहेत. अर्थात व्यापार उद्योगात त्यांना त्यांच्या परंपरेप्रमाणे अपवाद वगळता फारसे यश मिळालेले नाही.

Marathi Pratishthan

## ॲनेस्थेशिया - समज व अपसमज

**व्याख्यान व चर्चासत्र : ~~१२.१२.९८~~** [९.१.९९]

प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य डॉ. शरद दत्तात्रय मराठे, M.B.B.S.,D.A.,M.B.A. संमोहन व बधिरीकरण तज्ञ यांचे व्याख्यान व चर्चासत्र दि. १४.११.१९९८ रोजी आयोजित केले होते. अनेकांना याबाबतचे निमंत्रण वेळेवर पोचू शकले नाही.

त्यामुळे हे व्याख्यान-चर्चासत्र शनिवार दि. ९.१.१९९९ रोजी सायंकाळी ५ वाजता मराठे, उद्योग भवन, तळमजला, प्रभादेवी येथे होईल.

**कुलबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आहे.**

**सु. स. मराठे**
अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

## या अंकात


१. **अनुकरणीय-नागपूरकर मराठ्यांचे (विभागीय) संमेलन** पृ.१
२. **१६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत** ............. पृ.३
विनायक केशव, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान
३. **१९९७-९८ मधील परीक्षातले बक्षीसपात्र विद्यार्थी** .....पृ.४
४. **न्या. राम केशव रानडे यांच्या 'गीतेच्या गाभाऱ्यात' ह्या पुस्तकातील काही निवडक सुविचार** ................पृ.६
प्रेषक - सुरेश सखाराम
५. **सास्वा-सुनांचेच नव्हे, तर शब्दांचेही दिवस येतात** ......पृ.७
अनंत धोंडो खांबेटे
६. **स्मृती सुगंध** ..................................................पृ.८
गजानन भास्कर
७. **चकवा** (लघुकथा)..............................................पृ.९
विठ्ठल महादेव
८. **शुभ बोल नाऱ्या** (लघुनिबंध)...............................पृ.११
अश्विनीकुमार दत्तात्रय
९. **केवड्याचे कणीस** (लघुकथा) ...........................पृ.१२
श्रीपाद माधव
१०. **दक्षिण कन्नडातील चित्पावन** ..........................पृ.१४
एम. प्रभाकर जोशी
याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.५) आणि **खुषीपत्रे** (पृ.६) ही नेहमीची सदरे.


बुक पोस्ट

प्रति


मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan